www.rajdand.com
सातारा, मंगळवार
16.01.2024
पृष्ठ : ४ । मुल्य : ४ । मार्गशीर्ष कृ.२७
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
२५ वर्षे विश्वासार्हतेची

# निकालाला दुहेरी आव्हान

## ठाकरे गट सुप्रिम कोर्टात, तर शिंदे गटाची हायकोर्टात

**नवी दिल्ली : शिवसेनेच्या आमदार अपात्रतेप्रकरणी महाराष्ट्राचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी १० जानेवारी रोजी निकाल दिला. या निकालानुसार शिवसेनेच्या ठाकरे आणि शिंदे गटातील आमदार अनपेक्षितपणे पात्र ठरले आहेत. नार्वेकरांनी कोणत्याही गटातील आमदारांना अपात्र ठरवलेलं नाही. तसेच खरी शिवसेना म्हणून शिंदे गटाला मान्यता दिली आहे. त्यामुळे ठाकरे गट आक्रमक झाला आहे. उद्धव ठाकरे यांच्या गटाने नार्वेकरांच्या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यापाठोपाठ शिंदे गटानेही मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. तर, ठाकरे गटातील आमदारांना पात्र ठरवण्याच्या निणर्याविरोधात शिंदे गटाने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.**

राहुल नार्वेकर यांच्या निकालावर शिवसेनेचे दोन्ही गट असंतुष्ट असून दोन्ही गटांनी न्यायालयात धाव घेतली आहेच. यावर राहुल नार्वेकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. नार्वेकर यांनी काही वेळापूर्वी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बातचीत केली.

यावेळी नार्वेकर म्हणाले, मी कोणालाही संतुष्ट करण्यासाठी हा निकाल दिलेला नाही. मी कायद्याला धरूनच हा निकाल दिला. कायद्याच्या अनुषंगाने आणि संविधानातील तरतुदींचं पालन करून, त्याचबरोबर सर्वोच्च न्यायलयाच्या तत्वांच्या आधारावर हा निकाल दिला आहे.

दरम्यान, दोन्ही गटाने न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांवर राहुल नार्वेकर म्हणाले, आपल्या देशात कोणताही नागरिक संविधानाच्या कलम २२६ आणि कलम ३२ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयात किंवा उच्च न्यायालयात निश्चितपणे दाद मागू शकतो. त्यांनी याचिका दाखल केली म्हणजे मी दिलेला निर्णय अयोग्य ठरला असं होत नाही. माझा निर्णय अयोग्य ठरवण्यासाठी त्यात काही नियमबाह्य आहे का? त्यात काही घटनाबाह्य आहे का? अथवा काही बेकायदेशीर घडलंय का? ते न्यायालयाला दाखवावं लागेल. तसं सिद्ध केलं तरच तो निर्णय रिव्हर्स होऊ शकेल (मागे घेतला जाईल).




### नार्वेकरांनी काय निकाल दिला?

*शिवसेनेचे दोन गट झाल्यानंतर निवडणूक आयोगाने शिंदे गटाला खरी शिवसेना म्हणून मान्यता दिली होती. त्यामुळे ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आणि शिंदे गटातील आमदारांना अपत्र ठरवावं, अशी मागणी केली होती. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय घटनेतील नियमानुसार विधानसभा अध्यक्षांवर सोपवला होता. त्यानंतर तब्बल सात महिन्यांनी विधानसभा अध्यक्षांनी याप्रकरणी निकाल दिला. नार्वेकर यांनी १० जानेवारी रोजी मुंबईतील विधान भवनात या निकालाचं वाचन केलं. राहुल नार्वेकर यांनी खरी शिवसेना ही एकनाथ शिंदेंचीच असल्याचा निर्वाळा दिला. तसेच शिंदे गटातील आमदारांना पात्र ठरवलं. त्याचबरोबर नार्वेकर यांनी शिवसेनेच्या ठाकरे गटातील आमदारांनाही पात्र ठरवलं आहे.*

# अयोध्येत आजपासून धार्मिक विधी

## श्रीरामाच्या मूर्तीची १८ जानेवारीला गाभाऱ्यात स्थापना

**अयोध्या :** अयोध्येत २२ जानेवारी रोजी होणाऱ्या राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी धार्मिक विधींना आज, मंगळवारपासून प्रारंभ होणार आहे. १८ तारखेला श्रीरामाची मूती गाभाऱ्यामध्ये स्थापित केली जाणार असून धार्मिक विधी २१ जानेवारीपर्यंत सुरू राहतील, अशी माहिती राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र मंदिर ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांनी सोमवारी दिली.

प्राणप्रतिष्ठेच्या मुख्य सोहळ्यात २२ तारखेला दुपारी १२.२० वाजता सुरुवात होईल. हा विधी एक वाजेपर्यंत चालेल. संपूर्ण कार्यक्रम ६५ ते ७५ मिनिटांचा असेल, अशी माहिती राय यांनी दिली. या सोहळ्याचा मुहूर्त वाराणसीमधील ज्ञानेश्वर शास्त्री द्रविड यांनी काढला आहे. धार्मिक विधी वाराणसी येथील लक्ष्मीकांत दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली १२१ पुरोहित करणार आहेत. ज्या मूतीची प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहे ती पाषाणात घडविलेली असून १८ जानेवारीला ही मूती गाभाऱ्यात ठेवली जाईल. कार्यक्रमाच्या तयारीसाठी २० व २१ जानेवारी रोजी सवर्सामान्य भाविकांसाठी दर्शन बंद राहील. प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमात सात अधिवास आहेत असे राय यांनी नमूद केले.

प्राणप्रतिष्ठा विधीप्रसंगी गाभाऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी, सरसंघचालक मोहन भागवत, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्रचे अध्यक्ष महंत नृत्यगोपालदास, उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, सर्व विश्वस्त तसेच विविध परंपरेतील दीडशेहून अधिक संत-महंत उपस्थित राहतील. कार्यक्रमानंतर मान्यवरांची भाषणे होणार आहेत. खेळाडू, वैज्ञानिक, राजदूत, साहित्यिक, कलाकार, राजकारणी, प्रशासकीय अधिकारी यांना सोहळ्याचे आमंत्रण देण्यात आले आहे. याखेरीज मंदिर उभारणीच्या कामात सहभागी असलेले अभियंते व कामगारही सोहळ्यात सहभागी होणार आहेत. त्यासाठी आठ हजार खुर्च्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

मंदिरांमध्ये स्वच्छता अभियान

मानसरोवर, गंगोत्री, हरिद्वार, अमरनाथ, प्रयागराज, नमर्दा, गोदावरी, गोकर्ण अशा विविध स्थळांवरून अभिषेकासाठी जल आणल्याचे राय यांनी सांगितले. प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमापूवी विविध ठिकाणांहून जल, मृदा, सोने, चांदी, वस्त्रे आली आहेत. कार्यक्रमापूर्वी नागरिकांनी स्थानिक मंदिरांमध्ये स्वच्छता करावी तसेच प्राणप्रतिष्ठा झाल्यावर शंखध्वनी करावा व प्रसाद वाटप करावे, असे आवाहन राय यांनी केले आहे.

**मूर्ती निश्चित**

मैसुरू येथील अरुण योगीराज यांनी घडवलेली श्रीरामाची मूती मंदिरातील प्राणप्रतिष्ठेसाठी निवडण्यात आल्याची माहिती राय यांनी दिली. तीन मूतीमधून या मूतीची निवड करण्यात आली आहे. ही रामाची उभी मूती पाच फूट उंचीची असून ती पाच वर्षांच्या बालकाच्या रुपातील आहे. तसेच गेल्या ७० वर्षांपासून पूजा होत असलेली मूतीदेखील गाभाऱ्यात ठेवली जाणार असल्याचे राय यांनी नमूद केले.

# करोनाचा धोका वाढतोय!

## राज्यात २४ तासांत तीन मृत्यूंची नोंद



**पुणे :** राज्यात करोनामुळे मागील २४ तासांत तीन रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. त्यात पुणे, सांगली आणि ठाण्यातील प्रत्येकी एका रुग्णाचा समावेश आहे. या तिन्ही रुग्णांनी करोना लशीच्या दोन मात्रा घेतल्या होत्या, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाने सोमवारी दिली.

पुण्यातील करोना रुग्णाचा मृत्यू १२ जानेवारीला खासगी दवाखान्यात झाला असून, त्याचे वय ४९ वर्षे होते. तसेच त्याला स्तनाचा ककरोग, न्यूमोनिया आणि सेप्टीसीमिया आदी आजार होते. ठाण्यातील करोना रुग्णाचा मृत्यू ११ जानेवारीला शासकीय रुग्णालयात झाला असून, त्याचे वय ७३ वर्षे होते. त्याला मधुमेह आणि रक्तदाब हे आजार होते. सांगलीतील करोना रुग्णाचा मृत्यू १३ जानेवारीला शासकीय दवाखान्यात झाला असून त्याचे वय ५९ वर्षे होते. त्याला कोणत्याही सहव्याधी नव्हत्या. या तिन्ही रुग्णांनी करोना लशीच्या दोन्ही मात्रा घेतल्या होत्या, अशी माहिती आरोग्य सहसंचालक डॉ. आर.बी.पवार यांनी दिली.

राज्यात जेएन.१ या उपप्रकाराचे सर्वाधिक १५० रुग्ण पुण्यात आहेत. राज्यातील जेएन.१च्या एकूण रुग्णांपैकी ६० टक्के पुण्यात आहेत. त्याखालोखाल नागपूर ३०, मुंबई २२, सोलापूर ९, सांगली ७, ठाणे ७, जळगाव ४, अहमदनगर ३, बीड ३, छत्रपती संभाजीनगर २, कोल्हापूर २, नांदेड २, नाशिक २, धाराशिव २, अकोला १, रत्नागिरी १, सातारा १, सिंधुदुर्ग १ आणि यवतमाळ १ अशी रुग्णसंख्या आहे.

राज्यात ३५ नवीन रुग्ण

राज्यात मागील २४ तासांत करोनाच्या ३५ नवीन रुग्णांचे निदान झाले असून, ६० रुग्ण रुग्णालयातून बरे होऊन घरी गेले आहेत. राज्यात रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९८.१७ टक्के असून, मृत्युदर १.८१ टक्के आहे. राज्यात मागील २४ तासांत २ हजार ३८२ चाचण्या झाल्या. राज्यातील पॉझिटिव्हिटी दर १.४६ टक्के आहे, असे डॉ.पवार यांनी सांगितले.

# राज्यात 3 लाख कोटींचे सामंजस्य करार

## मुख्यमंत्री दावोस दौऱ्यावर

**मुंबई :** दावोस दौऱ्याचा खर्च, शिष्टमंडळातील प्रतिनिधींची संख्या यावरून होत असलेले सर्व आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी फेटाळून लावले. जागतिक आर्थिक परिषदेत राज्याचे प्रभावी ब्रॅण्डिंग करून सवर्दूर गुंतवणूक आणण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखालील राज्याचे शिष्टमंडळ मंगळवारी रात्री दावोसला रवाना झाले. यातून विक्रमी तीन लाख दहा हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात येणार असल्याचा दावा करण्यात आला आहे.

मुख्यमंत्र्यांच्या दावोस दौऱ्यावर विरोधकांनी टीका सुरू ठेवली आहे. वऱ्हाड निघालय दावोसला असे म्हणत




शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी दौऱ्याचा खर्च आणि शिष्टमंडळाच्या आकाराबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मात्र महाराष्ट्रात जास्तीत जास्त गुंतवणूक आकर्षित करण्याकरिता जागतिक आर्थिक परिषदेचा उपयोग केला जाईल, असे प्रत्युत्तर मुख्यमंत्र्यांनी दिले आहे.

दावोस येथे बुधवारपासून जागतिक आर्थिक परिषद सुरू होणार असून त्यासाठी मुख्यमंत्र्यांसह, उद्योगमंत्री उदय सामंत, उद्योग विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, मुख्यमंत्री सचिवालयातील वरिष्ठ अधिकारी असे दहा जणांचे शिष्टमंडळ रवाना झाले. मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरण व महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित (महाप्रित) कंपनी यांचे आठ अधिकारी स्वतंत्ररित्या सहभागी होत असून या सर्वांना केंद्र शासनाची मान्यता मिळाली आहे.

गेल्या वर्षी दावोस परिषदेत १ लाख ३७ हजार कोटींचे गुंतवणूक करार झाले होते. त्यापैकी ७६ टक्के करार प्रत्यक्षात आले आहेत. यंदा भारताच्या दालनाजवळ महाराष्ट्राचे अद्ययावत दालन उभारण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या घोडदौडीविषयी माहिती देणारे दृक श्राव्य प्रदर्शनही असेल. याठिकाणी मुख्यमंत्री सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करतील. मुख्यमंत्री ओमानचे उद्योगमंत्री, सौदीचे वित्तमंत्री, दक्षिण आफ्रिकेचे उर्जामंत्री, दक्षिण कोरियाच्या ग्योंगी प्रांताचे गव्हर्नर तसेच डीपी वर्ल्ड, लुईस ड्रेफस, वित्कोविझ एटोमिका या कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी यांच्याशी चर्चा करतील. मुख्य कार्यक्रमात काँग्रेस सेंटरमध्ये ह्यनागरी क्षेत्रातील आव्हाने, नावीन्यपूर्ण उपक्रम व शाश्वत विकासह्न या विषयावर शिंदे भाषण देतील. या परिषदेच्या माध्यमातून सुमारे अडीच ते तीन लाख कोटींची गुंतवणूक राज्यात येईल, असे नियोजन सरकारने केले आहे.

पोलाद, माहिती तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान क्षेत्राशी निगडित उद्योग, आण्विक ऊर्जा व नवीकरणीय ऊर्जा स्रोत-ग्रीन हायड्रोजन, हिरे व आभूषणे, डेटा सेंटर, लॉजिस्टिक्स, ऑटोमोटिव्ह त्याचबरोबर कृषी-औद्योगिक, कृषि आणि वनोपज यांचे मूल्यवर्धन करणारे उद्योग यावेत, यासाठी प्रयत्न करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले होते, त्यानुसार २० सामंजस्य करार केले जातील.

# शरद मोहोळ खून प्रकरणातील मुख्य आरोपीला अटक

**पुणे :** शरद मोहोळ खून प्रकरणात पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने रविवारी रात्री नवी मुंबई परिसरात कारवाई केली. मुळशीतील गुंड विठ्ठल शेलारसह रामदास मारणे यांच्यासह साथीदारांना नवी मुंबईत पकडले. गुन्हे शाखेच्या पथकाने मोहोळ खून प्रकरणात मुळशीतून चार जणांना ताब्यात घेतले.

मोहोळ खून प्रकरणात मारणेसह आतापर्यंत १४ जणांना अटक करण्यात आली आहे. ५ जानेवारी रोजी कोथरुडमधील सुतारदरा परिसरात मोहोळवर पिस्तुलातून गोळीबार करून खून करण्यात आला होता. मोहोळचा साथीदार असलेल्या साहिल उर्फ मुन्ना पोळेकर आणि साथीदारांनी खून केला होता. खून प्रकरणात दोन वकिलांना अटक करण्यात आली आहे. खून प्रकरणाचा तपास सुरू असताना पोलीस मुख्य सूत्रधाराचा शोध घेत होता. मुळशीतील गुंड विठ्ठल शेलार, रामदास मारणे नवी मुंबई परिसरातील एका फार्म हाऊसवर असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली. पोलिसांच्या पथकाने शेलार, मारणे यांच्यासह सहा जणांना नवी मुंबईतून ताब्यात घेतले. मुळशी तालुक्यातून चार जणांना ताब्यात घेण्यात आले.

शरद मोहोळचा खून करण्यापूवी मुळशीतील हडशी गावात मुख्य आरोपी मुन्ना पोळेकर आणि साथीदारांनी गोळीबाराचा सराव केला होता. मध्यरात्री झाडाच्या बुंध्यावर पोळेकर आणि साथीदारांनी पिस्तुलातून गोळ्या झाडून सराव केला. याप्रकरणी बंडगार्डन पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, पौड पोलीस ठाण्यात तपासासाठी सोपविण्यात आले आहेत.

साहिल उर्फ मुन्ना संतोष पोळेकर (वय २०, रा. सुतारदरा, कोथरुड), नामदेव महिपती कानगुडे (वय ३४, रा. भूगाव आणि कोथरुड), सतीश संजय शेडगे (वय २८, रा. स्वप्नशिल्प अपार्टमेंट, माथवाडी फाटा, भूगाव), आदित्य विजय गोळे (रा. गोळे आळी. पिरंगुट), नितीन अनंता खैरे (रा. नंदनवन सोसायटी, कोथरुड) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. मोहोळच्या खुनाच्या कटात सामील होण्यास नकार दिल्याने पोळेकर आणि कानगुडे यांनी अजय सुतार यांनी डिसेंबर महिन्यात भूगाव परिसरात अजय सुतार याच्यावर पिस्तुलातून गोळीबार केला होता. खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी पोळेकर आणि कानगुडे यांच्याविरुद्ध पौड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पोळेकर आणि साथीदारांनी जुलै महिन्यात मुळशी तालुक्यातील हाडशी गावातील बोडकेवाडी येथील कालेकर यांच्या शेतातील जांभळाच्या झाडाच्या बुंध्यावर पिस्तुलातून गोळ्या झाडल्याचे तपासात उघडकीस आले आहे. याप्रकरणी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर ऑक्टोबर महिन्यात पहिल्या आठवड्यात हाडशी गावातील सत्यसाईबाबा ट्रर्स्टच्या मागील बाजूस असलेल्या गोविंद उभे यांच्या मोकळ्या जागेत गोळीबाराचा सराव केला. बेकायदा शस्त्र बाळगल्याप्रकरणी बंडगार्डन पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# देवदर्शनाला नेण्याच्या बहाण्याने पत्नीचा खून

**पुणे :** पत्नीला देवदर्शनाच्या बहाण्याने सातारा जिल्ह्यातील मांढरदेवीत परिसरात नेल्यानंतर तिचा दरीत ढकलून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पत्नीला दरीत पडल्यानंतर ती झाडात अडकली. त्यानंतर तरुणाने साडीने तिचा गळा आवळून खून केल्याचे उघडकीस आले असून, तरुणाला लोणीकंद पोलिसांनी अटक केली आहे.

ललिता अमोलसिंग जाधव (वय ३६, रा. भैरवनाथ मंदिराजवळ, फुलगाव, ता. हवेली, जि. पुणे) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी पती अमोलसिंग मुरली जाधव (वय २६) याला अटक करण्यात आली आहे. पोलीस हवालदार प्रताप आव्हाळे यांनी याबाबत लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अमोलसिंगने पत्नी बेपत्ता झाल्याची तक्रार गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात दिली होती. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास करण्यात येत होता. अमोलसिंगने दिलेल्या माहितीनुसार पोलीस बेपत्ता झालेल्या ललिताचा शोध घेत होते.

त्यानंतर पोलिसांना तपासात महत्त्वाची माहिती मिळाली. चौकशीसाठी त्याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसी खाक्या दाखविताच त्याने पत्नीच्या खुनाची कबुली दिली. अमोलसिंगने कुटुंबीयांच्या दबाबामुळे वयाने मोठी असलेल्या ललिताशी विवाह केला होता. दोघांमध्ये दहा वर्षांचे अंतर होते.



त्याचे पत्नीशी वाद व्हायचे. वयाने मोठी असल्याने पत्नीला त्याने सोडचिठ्ठी देण्यास सांगितले होते. मात्र, ललिताने सोडचिठ्ठी देण्यास नकार दिल्याने तो तिच्यावर चिडला होता.

त्यांच्यात कायम वाद व्हायचे. २८ ऑक्टोबर २०२३ रोजी भाडेतत्त्वावर मोटार घेऊन दोघे जण सातारा जिल्ह्यातील मांढरदेवी येथे दर्शनासाठी निघाल्याचे सांगून बाहेर पडले. मांढरदेवी परिसरात पोहोचल्यानंतर त्याने मोटारचालकाला मोटार वाहनतळावर लावण्यास सांगितले. त्यानंतर दोघे जण घाटातून चालत निघाले. घाटात ललिताशी गप्पा मारण्याचा बहाणा केला. दरीजवळ थांबलेल्या ललिताला त्याने धक्का दिल्याने ती दरीत कोसळली.

दरीत कोसळल्यानंतर ती झाडाच्या फांदीत अडकली. अमोलसिंग दरीत उतरला. साडीने गळा आवळून तिचा खून केला. ती मरण पावल्याची खात्री केल्यानंतर मृतदेह दरीत ढकलून तो पसार झाल्याची माहिती तपासात उघड झाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने ही कामगिरी केली.

# जगातील पहिल्या ५ श्रीमंतांची संपत्ती दुप्पट, ५ अब्ज आणखी गरीब

**दावोस : जगातील पाच सर्वाधिक श्रीमंत व्यक्तींची संपत्ती २०२० पासून दुप्पट झाली असून तब्बल पाच अब्ज लोक अधिक गरीब झाले आहेत. दावोस येथे सुरू झालेल्या ह्यजागतिक आर्थिक परिषदेह्नच्या (डब्लूईएफ) पहिल्या दिवशी ऑक्सफॅम या संस्थेने आपला वार्षिक विषमता अहवाल प्रसिद्ध केला. त्यातून अनेक धक्कादायक निष्कर्ष उजेडात आले आहेत.**

इनइक्वालिटी इंक या अहवालानुसार जगातील सर्वात श्रीमंत पाच व्यक्तींची (सर्व पुरुष) संपत्ती २०२०मध्ये ४०५ अब्ज डॉलर होती, ती आता ८६९ डॉलरवर गेली आहे. संपत्तीवाढीचा हा वेग तासाला १४ दशलक्ष डॉलर इतका आहे. जगातील सर्वात मोठया १० कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांपैकी (सीईओ) सात सीईओ किंवा मुख्य समभागधारक हे अब्जाधीश (डॉलरमध्ये) असल्याची माहिती अहवालात देण्यात आली आहे. त्यांची एकत्रित संपत्ती १०.२ ट्रिलियन इतकी आहे. जागतिक कल असाच



### विषमता अहवालातील महत्त्वाचे मुद्दे

* दशकभरात जगातील पहिला ट्रिलियनर होणे शक्य
* श्रीमंतांच्या संपत्तीवाढीचा वेग तासाला १४ दशलक्ष डॉलर
* सर्वात मोठया १० कंपन्यांचे ७ सीईओ अब्जाधीश
* गरिबी संपविण्यासाठी २२९ वर्षांची प्रतीक्षा

राहिला तर, येत्या दशकभरात जगातील पहिला ट्रिलियनर (एक हजार अब्ज डॉलर संपत्ती असलेली व्यक्ती) पाहायला मिळेल, असा अंदाज या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे गरिबी संपण्यासाठी २२९ वर्षांचा कालावधी लागेल असे ऑक्सफॅमने म्हटले आहे.

जगभरातील आघाडीच्या १४८ कंपन्यांनी १.८ ट्रिलियन (एक हजार अब्ज) डॉलर नफा कमावला असून तो तीन वर्षांच्या सरासरीमध्ये ५२ टक्क्यांनी वाढला आहे. तसेच श्रीमंत समभागधारकांना मोठया प्रमाणात परतावा मिळाला असून तर कोटयवधी कर्मचाऱ्यांना प्रत्यक्षात वेतनकपात सहन करावी लागली आहे. सार्वजनिक सेवा, कंपन्यांचे नियमन, मक्तेदारी मोडून काढणे आणि कायमस्वरूपी संपत्ती व अतिरिक्त नफ्यावर कर आकारणी यांच्या माध्यमातून सार्वजनिक कृती करण्याचे आवाहन ऑक्सफॅमकडून करण्यात आले आहे.

ऑक्सफेमने जाहीर केलेल्या अहवालात २०२० पासून जगातील सर्वाधिक पाच श्रीमंत व्यक्तींची संपत्ती दुप्पट झाली असून जगभरातील तब्बल पाच अब्ज लोक अधिक गरीब झाल्याचे अधोरेखित झाले आहे.

# अस्वस्थ तरुणांची खदखद

राज्य, प्रदेश वा देश यांच्या विकासासाठी भौतिक पायाभूत सुविधा अत्यावश्यक हे खरेच. म्हणजे आधुनिक गतिमान रस्ते, महामार्ग, रेल्वे, विमान सेवा, वेगवान इंटरनेट इत्यादींची गरज असतेच असते. पण कोणतेही राज्य, प्रदेश वा देश यांत अत्यंत पायाभूत असतो तो विद्यार्थीवर्ग. जनसामान्यांसाठी भौतिक सोयी-सुविधा निर्माण करीत असतानाच उद्याचे नागरिक असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आश्वासक सोयी-संधी निर्माण करत राहणे हे कोणत्याही प्रदेशासाठी भविष्याची बेगमी करणारे असते. खराब, खड्डेयुक्त रस्त्यांमुळे वाहतुकीचा वेग मंदावेल; पण निराश, हताश विद्यार्थीवर्गामुळे ते राज्य वा प्रदेश आपले गती-प्रेरणाच हरवून बसेल. सध्या महाराष्ट्रातील विविध विद्यार्थीवर्गातील खदखद पाहता हा धोका आपल्या राज्यकर्त्यांनी ओळखायला हवा. गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने कानावर आदळणाऱ्या पेपरफुटीच्या बातम्या नोकरीच्या प्रतीक्षेत असलेल्या राज्यभरच्या लाखो सुशिक्षित बेरोजगारांच्या संतापात भर टाकणाऱ्या आहेतच, शिवाय त्या राज्य सरकारच्या विश्वासाहर्तेवर प्रश्नचिन्ह उभ्या करणाऱ्या आहेत. सध्या वारंवार येत असलेल्या तलाठी आदी भरतींतील कथित घोटाळयांच्या बातम्या आणि विद्यार्थ्यांतील असंतोष या प्रश्नचिन्हांची जाणीव करून देतात. उद्याच्या पिढीची ही खदखद वेळीच ओळखायला हवी.

नोकरीच्या संधी व बेरोजगारीचे प्रमाण कायम व्यस्त राहत असल्याने कुठलीही नोकरभरतीची प्रक्रिया ही पारदर्शक, त्यात सहभागी होणाऱ्या उमेदवारांचा विश्वास जिंकणारी असायला हवी. याकडे लक्ष देणे हे कुठल्याही सरकारचे कर्तव्यच. गेल्या दोन सरकारांच्या काळात या मूलभूत गरजेकडे वारंवार दुर्लक्ष होत असल्याचे दिसते. ही बाब अशोभनीय. मात्र सत्ताधाऱ्यांना त्याचे काहीही सोयरसुतक आहे, असे म्हणणे धाष्ट्याचे ठरेल. तलाठी भरतीतील घोळ समोर आल्यानंतर महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे धमकीवजा विधान हेच दर्शवते. राज्यात सुमारे ३० ते ३५ लाख तरुण सरळसेवा भरतीतून सरकारी नोकरीत येण्याच्या प्रतीक्षेत आहेत. अतिशय प्रतिकूल स्थितीत अभ्यास करून नोकरी मिळेल या आशेवर जगणाऱ्या या तरुणाईला वारंवार अपेक्षाभंगाच्या दुःखाला सामोरे जावे लागणे हे दुर्दैवी म्हणून सोडून देता येणारे नाही. करोनाकाळात खासगी कंपन्यांकडून परीक्षा घेण्याचा सरकारचा निर्णय आरोग्य खात्यातील भरतीच्या वेळी वादग्रस्त ठरला. यावरून नामुष्की ओढवल्यावर ही भरतीच रद्द केली गेली व टीसीएस व ह्यआयबीपीएसह्ल या नामांकित कंपन्यांना हे काम देण्यात आले. ह्यटीसीएसह्ल ही टाटा समूहातील अग्रगण्य कंपनी तर ह्यआयबीपीएसह्लला केंद्रपातळीवरील नोकरभरतीचा दीर्घ अनुभव. त्यामुळे तरुणांनी या निर्णयावर विश्वास ठेवला, पण आता त्यालाच तडा जात असल्याचे दिसून आले. ह्यटीसीएसह्लच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या नातेवाईकांना या भरतीत फायदा पोहोचवणे व लातूरसारख्या ठिकाणी प्रश्नपत्रिका फोडण्याचा गुन्हा दाखल होणे या अलीकडे त्यामुळे विश्वास तरी कोणावर ठेवायचा असा प्रश्न या भरतीकडे डोळे लावून बसलेल्या तरुणांना पडलेला दिसतो. महायुतीने सत्तेत आल्यावर ७५ हजार जागा भरू असे जाहीर केले. त्यासंबंधीचा शासकीय आदेश प्रसृत करताना एक लाखापेक्षा कमी उमेदवार असतील तर प्रति उमेदवार नऊशे रुपये, दोन ते तीन लाख असतील तर आठशे व पाच लाख असतील तर ४७५ रुपये प्रवेश शुल्क आकारू असे सांगितले. यानंतर झालेल्या बहुतांश परीक्षांमध्ये पाच लाखांपेक्षा जास्त उमेदवार सामील झाले. तरीही नऊशे रुपयेच शुल्क आकारले गेले. हे कसे? ही वसुली कशासाठी करण्यात आली? एकीकडे अशा शुल्कांतून सणसणीत कमाई करायची आणि त्याच वेळी दुसरीकडे निवड प्रक्रियादेखील घोळविरहित ठेवायची नाही. म्हणजे विद्यार्थ्यांसाठी ह्यइकडे आड आणि तिकडे विहीरह्ल अशीच अवस्था. अशाने नोकरीच्या प्रतीक्षेत वर्षांनुवर्षे रखडणाऱ्या तरुणांस वैफल्य छळणार आणि हे वैफल्यग्रस्त तरुण उमेदवार यावर चिडणार यात आश्चर्य ते काय. असे झाल्यावर सरकार या तरुणांनाच दमदाटी करणार. हे कायद्याचे राज्य?

अलीकडे झालेल्या सर्वच परीक्षांमध्ये गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास येते. कधी परीक्षा केंद्रावरच्या कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहकार्याने तर कधी उच्च तंत्रज्ञानाच्या मदतीने पेपर फुटतो वा प्रश्नांची उत्तरे पुरवली जातात. तरीही सरकारला जाग येत नसेल तर ही तरुणाईशी केलेली प्रतारणा नाही का? भरती प्रक्रियेची जबाबदारी असलेल्या या विविध यंत्रणांकडे संपूर्ण राज्यभर परीक्षा घेण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा नाहीत. त्यावर तोडगा म्हणून या कंपन्या विविध संगणक प्रशिक्षण केंद्रांना हाताशी धरतात. या केंद्रांतील संबंधितांनाच हाताशी धरून गैरप्रकार झाल्याचे मराठवाडा व विदर्भात अनेक ठिकाणी उघडकीस आले. तरीही सरकार आम्ही करतो ते योग्यच असा दावा कशाच्या बळावर करते? परीक्षा केंद्रे हाताळणारे, प्रश्नपत्रिका फोडणारे, सामूहिक कॉप्या करणारे अशा टोळयाच आता राज्यात तयार झालेल्या आहेत. त्यांच्या पाठीशी नेमके कोण आहेत? याची साधी चौकशीही करायची तयारी राज्यकर्ते दाखवत नाहीत. हा उद्दामपणा नाही तर आणखी काय? मागे ह्यटीईटीह्ल- शिक्षक पात्रता- परीक्षेत घोटाळा झाला म्हणून परीक्षा आयुक्तालाच अटक झाली. शिक्षण खात्यातील सचिव दर्जाचा सनदी अधिकारी गजाआड गेला. त्याला पुन्हा आता सेवेत घेण्यात आले. यातून सरकारला नेमका कोणता संदेश बेरोजगार तरुणांना द्यायचा आहे? अलीकडेच अर्थ व सांख्यिकी खात्यातील भरतीचा निकाल संशय निर्माण करणारा ठरला. कंपनीने निवड केलेल्या उमेदवारांच्या यादीत या खात्यातील काहींनी इतर नावे घुसवली, असा उमेदवारांचा आक्षेप आहे. त्याचे निराकरण करण्याची जबाबदारी सरकारची नाही काय? प्रत्येक परीक्षेतील गोंधळावर तरुण आक्षेप घेत असतानासुद्धा सरकार पेपरफुटीविरुद्ध कठोर कायदाही करायला तयार नाही. राज्यात असे प्रकरण उघडकीस आले की विद्यापीठ कायदा व माहिती तंत्रज्ञान कायद्यातील तरतुदीनुसार गुन्हा दाखल होतो. पण तो जामीनपात्र आणि त्यात जास्तीत जास्त सहा महिन्यांची शिक्षा. याचा फायदा घेत फूट प्रकरणातील अनेक आरोपी जामिनावर सुटले व नव्याने गैरप्रकार करू लागले. हे लक्षात येऊनसुद्धा सरकार ढिम्म असेल तर त्यातून नेमका कोणता अर्थ काढायचा? राजस्थान व उत्तराखंड या दोन राज्यांनी नव्याने कठोर कायदा करून अशा गुन्ह्यांतील आरोपींस किमान दहा वर्षे व कमाल जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद केलेली आहे. असा कठोर कायदा करा अशी तरुणांची मागणी असूनही त्यासाठी चालढकल का चालवली जात आहे? केवळ आश्वासन देऊन व समिती नेमून निवडणुकीपर्यंत वेळ काढायचा हाच सरकारचा हेतू यातून स्पष्ट दिसतो. हे सारे लक्षात येत असल्याने राज्यातला सुशिक्षित तरुण कमालीचा अस्वस्थ आहे. प्रत्येक गैरप्रकाराविरुद्ध सरकारकडे दाद मागणे व आंदोलने करणे यापलीकडे त्याच्या हातात काहीही नाही. या तरुणांची न्यायालयात जाण्याची ऐपतही नाही. अशा स्थितीत राज्य लोकसेवा आयोगाकडून नोकरभरतीची प्रक्रिया राबवणे हाच एकमात्र उपाय शिल्लक राहतो. त्यासाठी सरकार का तयारी दर्शवत नाही? या आयोगाची गरजच नसेल तर तो गुंडाळून तरी टाका. आयोग ठेवायचा आणि त्यास शासकीय भरतीचे नियोजित कामही द्यायचे नाही, यात काय शहाणपणा? केरळसारख्या सुशिक्षित राज्यात सर्वच शासकीय भरत्या आयोगामार्फतच होतात. अशा वेळी या आयोगाला अधिक सक्षम करणे, मनुष्यबळ पुरवणे यासाठी आता सरकारने पुढाकार घेतला नाही तर या अस्वस्थ तरुणाईच्या संतापाचा आणखी उद्रेक होईल आणि तो याच काय, कोणत्याही सरकारला परवडणारा नसेल. पूल, रस्ते बांधण्याप्रमाणेच तरुणांतील अस्वस्थता दूर करणे हीदेखील पायाभूत सुविधाच आहे.

## मावळ तालुक्यातील ठाकर बांधवांना जात प्रमाणपत्राचे वाटप



**सतिश गाडे / वडगाव मावळ**

मावळ तालुक्यातील चांदखेड येथील चंदनवाडीतील ५४ ठाकर बांधवांना जात प्रमाणपत्राचे रविवारी दि १४ वाटप करण्यात आले आमदार सुनील शेळके यांच्या माध्यमातून आदिम सेवा अभियान राबविण्यात येत आहे

या कार्यक्रमास माजी उपसरपंच मनोज येवले,राकेश घारे, चांदखेड सरपंच मिना माळी, उपसरपंच सागर गायकवाड, सदस्य प्रमोद गायकवाड, दादा केदारी,रुपाली गायकवाड, पुजा कदम,उमिर्ला गावडे,वैशाली गायकवाड, संजय गायकवाड, गोरख हिंगे,मधुकर जाधव,राजू गावडे, रोहिदास जाधव, संदीप गावडे व आजी-माजी सरपंच,सदस्य,ग्रामस्थ उपस्थित होते.


आमदार सुनील शेळके म्हणाले, ह्लठाकर समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हा एक प्रयत्न आहे.माझ्या ठाकर बांधवांना त्यांचा अधिकार मिळाला याचे समाधान आहे. शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी यापुढे प्रयत्नशील राहील.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंरही ठाकर समाजातील अनेक नागरिकांकडे जात प्रमाणपत्र उपलब्ध नाहीत. शैक्षणिक कामांसाठी, शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी जात प्रमाणपत्र आवश्यक आहे.परंतु शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर असलेल्या कुटुंबातील नागरिकांना जात प्रमाणपत्र काढण्यासाठी खुप त्रास सहन करावा लागतो.महत्वाची कागदपत्रे नसल्याने अनेक शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित रहावे लागते.आजपर्यंत विविध शिबिरे घेऊन योजनांचा लाभ देण्याच्या नावाखाली केवळ कागदपत्रे जमा केली जातात.परंतु महत्त्वाचे जात प्रमाणपत्र कोणीही मिळवून देत नव्हते.त्यामुळे आश्वासनांशिवाय या नागरिकांच्या पदरात काहीच पडले नव्हते.

परंतु आमदार सुनिल शेळके यांनी आदिम सेवा अभियान प्रभावीपणे राबवित तालुक्यातील प्रत्येक वाडी-वस्तीवर जाऊन कागदपत्रांची पूतर्ता करुन घेणे व शासन दरबारी सातत्यपूर्ण पाठपुरावा करणे यामुळे या नागरिकांना प्रमाणपत्र उपलब्ध झाले आहेत.अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर जातीचे प्रमाणपत्र मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष गायकवाड यांनी केले.

## कळव्यात बैतुलमल वेलफेअर मेडिकल सेंटर सुरू

**ठाणेः** कळवा परिसरातील जामा मस्जिद येथे दिः7/01/2024 रोजी रविवारी रोजी बैतुलमल वेलफेअर मेडिकल सेंटर चे उद्घाटन करण्यात आले या संस्थेची सुरुवात 2018 सुरू करण्यात आली होती व गेले पाच वर्ष बैतुलमल वेलफेअर संस्थेच्या माध्यमातून कळव्यातील नागरिकांसाठी ब्लड चेकअप अल्प दरात रुग्णसेवा देण्याचे कार्यरत काम चालू आहे असून आज रोजी नवीन जागेमध्ये दंतचिकित्सा नेत्र तपासणी डायबिटीस, त्वचारोग मेडिकल सेंटर सुरू करण्यात आलेले आहे या मेडिकल सेंटरमध्ये नामवंत डॉ नितीन देशपांडे नेत्र चिकित्सा तज्ञ डॉ फातिमा शेख स्त्रीतज्ञ डॉ शुद्रा खोत स्त्रीतज्ञ डॉ शोएब खान डायबिटीस तज्ञ डॉ विकास हजरणीस एमडी फिजिशियनस डॉ मोईन शेख चिल्ड्रन स्पेशलिस्ट तिरुपती भानुशाली त्वचारोग तज्ञ डॉ सोहम ठाकूर दंतचिकित्ता तज्ञ डॉ शालिमा गौतम डॉ फैजल बापे डॉ मोहीम या सर्व डॉक्टरांच्या मार्गदर्शनीखाली रुग्णांना सेवा दिली जाणार आहे बैतुलमल वेलफेअर सेंटरचे मुख्य उद्देश आहे सामान्य नागरिकांना या महागाईच्या काळामध्ये औषध उपचार परवडत नाही त्यामुळे या संस्थेच्या माध्यमातून रुग्णांना अल्पदरामध्ये सर्व उपचार देण्याचा व सामाजिक सेवा करण्याचा प्रयत्न बैतुलमल वेलफेअर मेडिकल सेंटरचा मुख्य उद्देश आहे असे पदाधिकाऱ्यांनी सांगितले




## ठामपा क्षेत्रात अनधिकृत बांधकामांवर कारवाई


### दिवा, मुंब्रा, कळवा, मानपाडा या भागात झाली कारवाई

**ठाणे :** ठाणे महानगरपालिका क्षेत्रात मंगळवारी दिवा, मुंब्रा, कळवा, मानपाडा या भागात अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली. इमारती, अनधिकृत गाळे, बैठे बांधकाम यांच्यावर महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथक आणि प्रभाग समितीनिहाय पथकांनी ही कारवाई केली. मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या निर्देशानुसार, ठाणे महापालिका क्षेत्रात सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाईची धडक मोहीम सलगपणे राबविण्यात येणार आहे.

दिवा क्षेत्रात, जिवदानी नगर, प्रियदरशनी अपाटमेंटजवळ एका इमारतीच्या पाचव्या मजल्यावर कारवाई करण्यात आली. तसेच, दिवा पूर्व येथील दत्त मंदिराच्या शेजारी असलेल्या इमारतीच्या सहाव्या मजल्याचा स्लॅब तोडण्यात आला. शिबलीनगर गेटच्या समोर दोन मजली बांधकाम पाडण्यात आले. एमएस कम्पाऊंडमधील दोन मजल्यांच्या वर कॉलम असलेल्या तीन इमारतींवर कारवाई करण्यात आली.

मुंब्रा येथे नताशा चाळ येथे एक मजली बांधकाम निष्कासित करण्यात आले.

कळवा येथे कुंभार आळीत एका तळमजल्याचे आरसीसी स्लॅब व दुसऱ्या मजल्याच्या स्लॅबसाठी




उभारण्यात आलेले सेंट्रीग व स्टील काढण्यात आले. तसेच, विटावा गणेश विसर्जन घाट येथे तिसऱ्या आणि चौथ्या मजल्याचे स्लॅब ब्रेकर मशीनच्या सहाय्याने तोडण्यात आले. माजिवडा-मानपाडा भागात कासारवडवली येथे रत्नतेज इमारतीजवळील बैठे बांधकाम, तीन गाळ्यांचे वाढीव बांधकाम काढण्यात आले.


## उपवन तलावाचे सौंदर्य आणखी उजळले!'

**ठाणे :** ऐतिहासिक ओळख असलेल्या निसर्गरम्य अशा उपवन तलावाचे सौंदर्य संगीतमय कारंजे आणि बनारसच्या धर्तीवरील घाटामुळे आणखी उजळले आहे, असे प्रतिपादन मा. मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी केले.

आमदार प्रताप सरनाईक यांच्या प्रयत्नांमुळे राज्य सरकारने दिलेल्या निधीतून, ठाणे महापालिकेने उपवन तलाव येथे संगीतमय कारंजे आणि घाट यांची उभारणी केली आहे. संगीतमय कारंजे हे 'वॉटर स्क्रीन'सह आहेत. त्यावर, दाखविण्यासाठी मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील तीन शो तयार करण्यात आले आहेत. त्यांचे दिग्दर्शन विजू माने यांचे आहे. छत्रपती शिवाजी महाराज, ठाणे शहराचा इतिहास आणि राम मंदिर असे या शोंचे विषय आहेत. हे कारंजे आणि घाट यांचे लोकार्पण मा. मुख्यमंत्री महोदय यांनी संस्कृती कला उत्सवाच्या तरंग या पाण्यावरील रंगमंचावर केले. त्याप्रसंगी, खासदार श्रीकांत शिंदे, आमदार प्रताप सरनाईक, ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी नगरसेविका परिषा सरनाईक, आशा डोंगरे, जयश्री डेव्हिड, माजी नगरसेवक पुर्वेश सरनाईक, महापालिका आयुक्त अभिजीत बांगर आदी मान्यवर उपस्थित होते.ठाणे शहर आता बदलू लागले आहे. स्वच्छ होत आहे, रस्ते चांगले होत आहेत. महापालिकेची सर्वंकष स्वच्छता मोहीम उत्तम सुरू आहे. आपल्याला ठाणे शहर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी करायचे आहे, असे मुख्यमंत्री महोदय याप्रसंगी म्हणाले. उपवन तलाव परिसरात ठाणेकर आतापर्यंत फक्त चालायला, फिरायला यायचे आता त्यांना या संगीतमय कारंजाचाही आनंद घेता येईल. नागपूरला फुटाळा तलावातील कारंजे पाहिल्यावर आमदार प्रताप सरनाईक यांना असे कारंजे ठाण्यात करण्याबद्दल बोललो होतो. त्यांनी पुढाकार घेऊन वर्षभरात कारंजे सुरू करूनही दाखवले, असेही मुख्यमंत्री महोदयांनी नमूद केले. तसेच, येथील शो विनामूल्य ठेवावेत, असे निर्देशही त्यांनी महापालिका आयुक्तांना दिले.

## अनिल कपूर ला फायटर ने शिस्त आणि निःस्वार्थ काम शिकवले आहे

अनिल कपूर, हृतिक रोशन, दिग्दर्शक सिद्धार्थ आनंद आणि फायटरच्या कलाकार आणि क्रू सदस्यांनी आज मुंबईत पत्रकार आणि फॅन मीटमध्ये हवाई ॲक्शन चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च केला. या चित्रपटाबद्दल बोलताना कपूर म्हणाले ₹ हा एक अभूतपूर्व प्रवास होता. मला आशा आहे की हा प्रवास रिलीजनंतरही सुरू राहील. या चित्रपटाने मला शिस्त आणि निस्वार्थ काम शिकवले आहे. आज आमी डे आहे आणि ट्रेलर लॉन्च करण्याचा एक उत्तम दिवस आहे. चित्रपटाबद्दल मला खूप उत्सुकता आहे आणि मी भारावून गेलो आहे आणि संपूर्ण टीमसोबत काम करताना मला आनंद होत आहे.₹




अनिल कपूरने ग्रुप कॅप्टन राकेश जयसिंगचा भाग पाहण्यासाठी फिटनेस प्रवासाला सुरुवात केली ज्यांना प्राणघातक लढाऊ वैमानिकांच्या टीमची देखरेख करण्यासाठी नियुक्त केले आहे कारण ते पीओकेमध्ये बदला घेण्याच्या तयारीत आहेत. सह-अभिनेता रोशनने कपूरला त्याच्या वयानुसार दिसणारा आणि कडक शरीरयष्टीमुळे चित्रपटातील सर्वात तरुण सेनानी म्हणून संबोधले.

फायटर भारतीय वायुसेनेच्या लढाऊ वैमानिकांच्या गटाची, त्यांचे जीवन आणि साहस यांची कथा आहे. सिद्धार्थ आनंदच्या टं१ि'७ द्ब३४१ि२ आणि Viacom18 Studios द्वारे निर्मित, हा चित्रपट नियोजित फ्रँचायझीमधील पहिला आहे आणि 25 जानेवारी रोजी रिलीज होणार आहे.

## प्रवाशाने पायलटवर हल्ला केल्यानंतर सोनू सूदने एअरलाईन स्टाफला पाठिंबा दिला

एका प्रवाशाने वैमानिकाला मारहाण केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेता सोनू सूदने एअरलाइन्स कर्मचाऱ्यांशी एकजूट दाखवली आहे. अस्वीकार्य वतर्नावर टीका करताना, सूद यांनी उड्डाण कमर्चार्यांसाठी स्व-संरक्षण कार्यक्रमांची संभाव्य गरज सुचविली. तीन तासांच्या विलंबाचा अनुभव घेतल्यानंतर, त्यांनी अनुयायांना आव्हानात्मक परिस्थितीत एअरलाइन कमर्चार्यांशी संयम आणि विनम्र राहण्याचे आवाहन केले. अभिनेत्याने यावर जोर दिला की प्रवाशांकडून गैरवर्तन वाढवण्यासाठी पायलट आणि क्रूसाठी अतिरिक्त सुरक्षा उपायांची आवश्यकता असू शकते. त्याच्या सोशल मीडिया हँडलवर एक पोस्ट केली आहे.

हवामानातील देवांचा स्वतःचा मूड असतो मानवी नियंत्रणाबाहेर ही परिस्थिती असते. मी विमानतळावर गेल्या ३ तासांपासून धीराने वाट पाहत आहे. मला माहित आहे की हे अवघड आहे परंतु प्रत्येकाने एअरलाइन क्रूशी नम्रपणे



वागण्याची विनंती करतो. ते त्यांचे सर्वोत्तम प्रयत्न करत आहेत! अनेकदा काही वेळा मी लोकांना त्यांच्याशी अतिशय उद्धटपणे वागताना पाहतो. काही परिस्थिती कोणाच्याही नियंत्रणाबाहेरच्या असतात आणि प्रत्येकाचा आदर केला पाहिजे हे आपण समजून घेतले पाहिजे.

दैनिक राजदंड

प्रशिक्षणार्थी बातमीदार, उपसंपादक नियुक्त करण्याबाबत TRAINEE REPORTERS, SUB-EDITORS
पाहिजेत

पत्रकारितेतील **मानदंड ठरणाऱ्या दै. राजदंडची (MARATHI) पुणे आवृत्ती आणि THEDEMOCRAT.LIVE (ENGLISH)** नुकतीच सुरू झाली आहे. शहर व जिल्ह्यातील राजकीय घडामोडी, सामाजिक समस्या, शिक्षण, साहित्य, कला, क्रीडा, सांस्कृतिक, उद्योग विश्वातील बदलाची माहिती वाचकांपर्यत पोहचविण्याचा या वृत्तपत्राचा मानस आहे. प्रिंट, ऑनलाईन, युट्यब या माध्यमात राजदंड मीडिया समूहाचे काम चालणार आहे.

पत्रकारितेत करिअर करू पाहणाऱ्या युवक-युवतीसाठी **दै. राजदंडचे** व्यासपीठ दिशादर्शक ठरणार आहे. नवोदित पत्रकारांना हा महत्वाचा प्लॅटफार्म आहे. प्रशिक्षणार्थी बातमीदार, उपसंपादक म्हणून काम करण्याची इच्छा असणाऱ्या आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना **दै. राजदंडमध्ये** संधी उपलब्ध करून देत आहे. तरी याची माहिती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना द्यावी, ही विनंती.

**कल्पना सुर्वे,**
**संचालक,** (HR) दै. राजदंड, पुणे
email: rajdand.pune@gmail.com

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# भरधाव डंपरच्या टायरखाली चिरडून महिलेचा जागीच मृत्यू

## कापूरहोळ - भोर रोडवर संगमनेर गावची घटना

**भोर - रुपेश जाधव**

**कापूरहोळ -** भोर मार्गावर नेकलेस पॉइंट जवळ संगमनेर (ता.भोर) गावच्या हद्दीत सोमवार (दि.१५) रोजी सकाळी ९:३० वाजण्याच्या सुमारास लताबाई गोपाळ येलमकर (वय ६५ वर्षे, सध्या रा. कोल्हेवाडी, खडकवासला,पुणे) या महिलेचा डंपरच्या टायर खाली चिरडून जागीच मृत्यू झाला असल्याची घटना घडली आहे.

या घटनेबाबत मिळालेली माहिती अशी की, अविनाश गोपाळ येलमकर( वय ३९ वर्षे सध्या रा.कोल्हेवाडी, खडकवासला,पुणे ) हे त्यांची आई लताबाई येलमकर यांना बरोबर मोटार सायकलवरून मुळगाव उदोरी (ता.महाड) येथे कापूरहोळ-भोर मार्गावरून चालले होते. सध्या कापूरहोळ -भोर - मांढरदेव रोडचे काम जोमात सुरु असल्याने रस्त्यावर माती, दगड, धुळीचे प्रमाण वाढले आहे. त्यातच रस्त्यावरील कामावर असलेले डंपर सुसाट वेगाने चालवले जातात त्यामुळे ह्या मार्गावर दुचाकी सह चारचाकी वाहन चालवणे मुश्किल झाले असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो आहे.

त्यातच नेकलेस पॉइंट जवळील उतारावर संगमनेर गावच्या हद्दीत सोमवारी सकाळी ९:३० वाजण्याच्या सुमारास रस्त्यावर टाकलेल्या खडीवरून अविनाश यांचा तोल जाऊन मोटरसायकल ( एम.एच.१२ पी.यु.३०९३) घसरली त्याच वेळेस त्यांच्या मागून भरधाव वेगाने येणाऱ्या डंपरच्या (एम.एच. १३ डी.क्यू.००९२) टायर खाली लताबाई येलमकर या महिलेचे डोके सापडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेत डंपर चालक पळून गेला असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले.

सदर घटनेची माहिती मिळताच राजगड पोलीस घटना स्थळी दाखल झाले असून त्यांनी त्यांनी सदर महिलेचा मृतदेह ताब्यात घेऊन भोर येथील उपविभागीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला आहे.

# मावळातील गृह प्रकल्पांच्या सुविधांची होणार पाहणी

## आमदार सुनिल शेळके यांची माहिती

**वडगाव मावळ /सतिश गाडे**

मावळ तालुक्यात वीस पेक्षा अधिक सदनिका असलेल्या गृहप्रकल्पांची पीएमआरडीए मार्फत सोळा जानेवारीपासून पाहणी करण्यात येणार असून या प्रकल्पांमध्ये संबंधित बिल्डरकडून सोसायटीतील नागरिकांना पाणी,वीज,रस्ता, सांडपाणी व्यवस्था इ.भौतिक सुविधा दिल्या आहेत की नाही याची माहिती घेण्यात येणार आहे,अशी माहिती आमदार सुनिल शेळके यांनी दिली.



पीएमआरडीए हद्दीमधील गृह प्रकल्पांमध्ये झालेली अनियमितता तसेच या प्रकल्पांद्वारे नदीमध्ये होणारे प्रदूषण रोखण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीची बैठक विभागीय आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार (दि.१५) संपन्न झाली.या बैठकीत १६ जानेवारीपासून पीएमआरडीए मार्फत मावळ तालुक्यातील वीसपेक्षा अधिक सदनिका असलेल्या गृह प्रकल्पांची २६ जानेवारीपर्यंत पाहणी करण्यात येणार असून यामध्ये संबंधित विकसकांकडून सोसायटीधारकांना मूलभूत सुविधा दिल्या आहेत की नाही याची माहिती घेण्यात येणार आहे.त्यानंतर १ फेब्रुवारी २०२४ रोजी होणाऱ्या बैठकीत पुढील कार्यवाहीसाठी अहवाल सादर करण्यात येणार आहे.

गृहप्रकल्पांमधील सांडपाणी थेट इंद्रायणी व पवना नदी पात्रात

मावळ तालुक्यात मोठे गृहप्रकल्प, टाऊनशिप उभारल्या जात आहेत. संबंधित बिल्डर्सकडून रहिवाशांना रस्ते,पाणी,वीज,सांडपाणी व्यवस्था इत्यादी सुविधा देण्याचे आश्वासन दिले जाते.परंतु प्रत्यक्षात अनेक ठिकाणी नागरिकांची मुलभुत सुविधा अभावी गैरसोय होत असल्याचे निदर्शनास येते.तसेच या गृहप्रकल्पांमधील सांडपाणी थेट इंद्रायणी व पवना नदी पात्रात सोडले जाते.तरीदेखील अशा प्रकल्पांना पूर्णत्वाचा दाखला कसा काय मिळतो याबाबत आमदार सुनिल शेळके यांनी अथर्संकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी मांडून सरकारचे या प्रश्नाकडे लक्ष वेधले होते.या पाश्वर्भूमीवर आवश्यक नियम व शिफारशी करुन त्याचा सर्वसमावेशक अहवाल शासनास सादर करण्यासाठी गठीत केलेल्या समितीकडून उपाययोजना करण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

# घरफोडी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना महाळुंगे पोलिसांकडून अटक

## गुन्हेगारांकडून घरफोडीचे अठरा गुन्हे उघडकीस

**कुरुळी :** महाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी घरफोडी करणाऱ्या एका आरोपीला अटक केली होती. आरोपीकडे असलेल्या दुचाकीच्या चाकावरुन पोलिसांनी आरोपीला अटक केली.पोलिसांनी त्याच्या साथीदाराला देखील अटक केली आहे. दोन्हीही आरोपींकडून ४५ लाख ३३ हजारांचा मुद्देमाल जप्त करुन १८ गुन्हे उघडकीस आणले आहेत.आमिर शब्बीर शेख (वय-२५ सध्या रा. निगडी प्राधिकरण मुळ रा. वडेश्वर काटे, वडगाव मावळ), सोहेल शफीक पठाण (वय-२५ रा. खंडोबा मंदिर पायथा, निमगाव, ता. खेड) असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.




खेड तालुक्यातील मोई येथे झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेत असताना पोलिसांनी आमिर शेख याला 2 जानेवारी रोजी रात्री सव्वा नऊच्या सुमारास अटक केली. शेख याला त्याच्याकडे असलेल्या दुचाकीच्या लाल रंगाच्या चाकावरुन अटक केली. आरोपीकडून चोरलेले सोन्याचे दागिने, रोख रक्कम व दुचाकी असा एकूण २९ लाख ३ हजार ४०० रुपयांचा ऐवज जप्त केला. गुन्ह्याचा अधिक तपास करुन पोलिसांनी त्याचा साथीदर सोहेश पठाण याला अटक केली. अटक केलेल्या आरोपींनी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील येलवाडी, सदुंबरे, इंदोरी, तळेगाव दाभाडे, मोशी,चिखली परिसरात घरफोडी केल्याचे सांगितले. चोरी करताना रस्त्यालगत असणाऱ्या बंगल्याची रेकी करुन बंगले लॉक असताना व लाईट बंद असल्यास बंगल्याच्या मागील खिडकीचे गज कापून आत प्रवेश करून चोरी केल्याची कबुली दिली. आरोपींकडून ४५ लाख ३३ हजार ४०० रुपये किमतीचे १ किलो ७ तोळे २ ग्रॅम सोने, रोख रक्कम, गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त केली आहे.ही कामगिरी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी,पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे, सहायक पोलीस आयुक्त राजेंद्र गौर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक वसंत बाबर, पोलीस निरीक्षक गुन्हे संतोष कसबे, पोलीस उपनिरीक्षक विलास गोसावी, पोलीस अंमलदार प्रदिप गायकवाड,दिनेश चव्हाण, राजू कोणकेरी, अमोल बोराटे, युवराज बिराजदार, संतोष होळकर, विठ्ठल वडेकर, राजु जाधव, संतोष काळे,किशोर सांगळे, शिवाजी लोखंडे, बाळकृष्ण पाटोळे, राजेंद्र खेडकर, संतोष वायकर, गणेश गायकवाड, राहुल मिसाळ,अमोल माटे यांच्या पथकाने केली.

# शरदचंद्रपवार कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात एक दिवसीय आयकरा संबंधित अतिथी सत्र संपन्न

**मनोहर हिंगणे/ओतूर**

श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ शरदचंद्रजी पवार कॉलेज ऑफ फामसी ओतूर महाविद्यालयामध्ये आय.क्यू.ए.सी सेल एस.पी.सी.ओ.पी आणि इंडियन फार्मासिस्ट असोसिएशन रुरल ब्रांच आळेफाटा यांच्या संयुक्त विद्यमाने आयकर अधिकाऱ्यांमार्फत आयकर संबंधी होणाऱ्या सामान्य चुका आणि आयकर व्यवस्थापन या विषयावर एक दिवसीय चर्चासत्र १२ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित केले होते. सदर चर्चा सत्रासाठी संस्थेचे मानद सचिव वैभव तांबे ,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश दामा, आयकर विभाग अधिकारी- क्रिष्णा प्रताप सिंग, वकील हकीम आणि गणेश शर्मा, त्याचबरोबर व्ही.जे.एस.पी. एम चे सीईओ डॉ. दुष्यंत गायकवाड मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. बऱ्याचदा आयकर देयकांमध्ये आयकरा बद्दल संभ्रमाचे विचार असतात, कित्येक प्रश्न असतात की त्यांची उत्तरं सापडता सापडत नाहीत. योग्य मार्गदर्शनाचा अभाव, विश्वासार्ह माहितीची कमतरता या सर्व कारणांमुळे आयकर हा संभ्रमाचाच विषय राहिलेला आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश दामा यांच्या संकल्पनेतून हाच आयकरा विषयी विषयी संभ्रम दूर करण्यासाठी सदर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.




संस्थेचे मानत सचिव वैभव तांबे यांच्या शुभहस्ते आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांची ओळख करून देण्यासोबत आयकरा विषयी प्राथमिक माहिती ,आयकर सबंधित प्राथमिक प्रश्न ,डॉ.गणेश दामा यांनी उपस्थित करून त्याविषयी मार्गदर्शन करण्याचे आवाहन आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांना केले. आयकर शासन निर्णय काय सांगतो? आयकर भरण्याचे फायदे, आयकर चुकवल्यानंतर होणारी कार्यवाही याविषयी अतिशय उत्तम मार्गदर्शन आयकर विभागाचे प्रशासकीय अधिकारी क्रिष्णा प्रतापसिंग यांनी केले. आयकर भरण्याची योग्य पद्धत, आयकर नियम, अटी व शती अशा अनेक कायदेशीर चौकटींची विश्लेषणात्मक माहिती आयकर विभागाचे अधिकारी वकील हकीम यांनी श्रोत्यांना दिली. सदर कार्यक्रमासाठी शिक्षण क्षेत्रातील अनेक तज्ञ आणि प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या त्यामध्ये शरचंद्र पवार अभियांत्रिकी महाविद्यालय प्राचार्य डॉ. खरात सर ,शरचंद्र पवार व्यवस्थापन महाविद्यालय प्राचार्य डॉ. काकड सर, शारदाताई पवार महाविद्यालय मुख्याध्यापक बोऱ्हाडे सर, वीर सावरकर महाविद्यालय प्राचार्य बोबडे सर ,सावित्रीबाई फुले महाविद्यालय प्राचार्य शेख सर, विलासरावजी तांबे महिला महाविद्यालय प्राचार्य डॉ. देवकर सर, विद्यानिकेतन कॉलेज ऑफ फामसी प्राचार्य डॉ. तेजस पाचपुते, पंचक्रोशी मधील सर्व महाविद्यालयांतील कार्यालय अधीक्षक, लिपिक, प्राध्यापक वर्ग आदि प्रतिष्ठित मान्यवर असे तब्बल शंभरहून अधिक श्रोतावर्ग उपस्थित होता. त्याचबरोबर शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ फामसी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कमर्चारी उपस्थित होते . सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जयंत बिडकर यांनी केले.

# ग्रामीण भागात घरोघरी मातीच्याच चुली

## मातीच्या चुलिंना आजही मागणी

## चुलीवरच्या भाकरीचा आस्वादच लय भारी



**ओतूर, मनोहर हिंगणे**

सर्वत्र एकसमान परिस्थिती असली की ह्यघरोघरी मातीच्या चुलीह्ल ही म्हण वापरण्याची पद्धत आपल्याकडे आहे. परंतु, बदलत्या काळातही मातीच्या चुली जुन्नर तालुक्यातील अणे-माळशेज पट्ट्यातील घरोघरी पाहावयास मिळत आहेत. आजही अणे-माळशेज पट्ट्यातील बहुतांश घरात मातीच्या चुलीचा वापर केला जात आहेत.आजही ग्रामीण भागात सौरगॅस, बायोगॅस यांसह विविध उपक्रमही असले, तरी काही ग्रामस्थांकडे मातीच्या चुलीलाच प्राधान्य दिले जात आहे. अंगणाच्या बाहेर या चुली उभारलेल्या पाहायला मिळत आहेत.

आधुनिकता कितीही आली, तरी ग्रामीण भागापर्यंत लवकर पोहचत नाही, हे यातून दिसून येते.

विविध कंपन्यांचे गॅस, इलेक्ट्रिक शेगड्यांच्या जमान्यात मातीच्या चुलींचा वापर कमी झाला असला तरी गृहप्रवेश, धार्मिक विधी, लग्न समारंभापूवी चुलींची आवश्यकता असते. त्यामुळे या चुलींना आजही मागणी आहे.

गॅस सिलेंडरच्या वाढत्या किमतीमुळे सवर्सामान्यांना ते परवडेनासे झाले आहे. त्यामुळे ग्रामीण भागात चुलीवर जेवण बनविले जाते. त्यामुळे इंधनखर्चातही बचत होत असल्याने अधिकची पसंती मिळत आहे. परिणामी, चुलींना मागणी कायम असल्याचे व्यावसायिक सांगतात.

कुंभार समाजाचा पारंपरिक व्यवसाय मातीच्या चुली तसेच मातीपासून मडकी, तवे आदी वस्तू बनविण्याचा आहे. शेतातील चिकट मातीच्या सहाय्याने अप्रतिम कलाकौशल्याने येथील कुंभार समाज मातीच्या विविध वस्तू घडवित असतात.

आजही इलेक्ट्रिक व गॅस शेगडीच्या जमान्यात मातीच्या चुलीची मागणी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात आहे. ग्रामीण भागातील बहुसंख्य कुटुंबात जेवण करणे, पाणी गरम करणे आदींसाठी मातीच्या चुलीचा वापर केला जातो. त्यासाठी नजीकच्या जंगल भागातील लाकुडफाटा अगदी स्वस्त दराने, त्वरित उपलब्ध होत असल्याने आजही मातीच्या चुलीचे मोठे महत्त्व ग्रामीण भागात टिकून आहे. मातीच्या चुली बनविण्यासाठी आता अडचणीदेखील वाढल्याचे शकुंतला सूयर्वंशी यांनी सांगितले. चुली बनविण्यासाठी शेतातील खळगट माती, नदी पात्रातील पोयटा, बाजरीच्या बनग्या आवश्यक असतात. पोयटा, बनग्या मिळत नाहीत. पूवीच्या काळी चुली विक्रीतून धान्य मुबलक प्रमाणात मिळायचे, परंतु आता रोख पैसे देऊन महिला चुली विकत घेतात, असे कुंभार व्यवसायिक शकुंतला गबाजी सूयर्वंशी यांनी सांगितले.

# चिंचोली शाळेतील विद्यार्थ्यांनी भरवला बाल आनंद मेळावा आणि भाजीबाजार

**चाकण, चिंचोशी, ता. खेड** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचोशी केंद्र शेलपिंपळगाव येथील शाळेमध्ये बालआनंद मेळावा व बालगोपाल भाजीबाजार व खाऊ गल्लीचे आयोजन करण्यात आले होते.

बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य व पालक,ग्रामस्थांनी केले. शाळेतील लहान मुलांनी आपापल्या शेतातून मेथी,वांगी,टोमॅटो,वाल, घेवडा,हरभरा संक्राती साठी लागणारे भाजीपाला तसेच खाऊगल्ली मध्ये भेळ,बटाटेवडे, भजी, इडली सांबर,चिक्की असे अनेक पदार्थ विक्री साठी ठेवले होते.

आपल्या पाल्याचा आनंद मेळावा भाजीपाला बाजार पाहण्यासाठी आवर्जून उपस्थित राहिले.मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी अनेकांनी काहीना काही वस्तू खरेदी केली.

नेहमी मुलांनी आपल्या आई वडिलांना बरोबर बाजारात भाजीपाला खरेदी करताना पाहिले होते परंतु आज स्वतः विक्री करण्यासाठी बसल्यानंतर त्यांना वेगळाच अनुभव, आनंद मिळाला हे त्यांच्या आनंदी चेहऱ्यावर दिसत होते.

गावातील ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य,सोसायटी चेअरमन, सदस्य व ग्रामस्थांनी भेट देऊन मुलांचे कौतुक केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचोशी मुख्याध्यापक, शिक्षक यांनी या आनंद बाल मेळाव्यासाठी विशेष प्रयत्न केले. सर्व शिक्षक स्टाफ यांनी भाजीपाला बाजारात येणाऱ्या प्रत्येकाचे स्वागत केले. सर्वांचे आभार मानले.

# श्रीमंत गायकवाड सरकार यांच्या दावडीच्या किल्ल्यात पानिपत शौर्यदिन साजरा

**राजगुरूनगर** : सालाबादप्रमाणे या वषीही दावडी (ता. खेड ) येथे मराठा शौर्य दिनाचं आयोजन करण्यात आलं होतं.१४ जानेवारी १७६१ याच दिवशी पानिपतच्या तिसऱ्या युद्धात अहमद शहा अब्दालीसारख्या परकीयाचं आक्रमण रोखण्यासाठी मराठ्यांनी आपल्या प्राणाची बाजी लावली होती. किल्ल्यातील गायकवाड यांच्या राजवाड्यात श्रीमंत दामाजीराव गायकवाड यांच्या गादीला मानवंदना देण्यात आली. यावेळी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी तख्त पूजन करुन पानिपतचा इतिहास सांगितला. यावेळी श्रीमंत विजयराव गायकवाड यांच्या समाधीचा लोकार्पण सोहळा डॉ. अमोल कोल्हे यांच्या हस्ते संपन्न झाला.




मराठ्यांच्या इतिहासात सर्वांत 'रणधुरंदर' लढाई कुठली मानली जाते, तर ती पानिपतची लढाई. कारण ही लढाई मराठे हरून देखील जिंकल्यासारखे आहे. याचा वारसा जपण्यासाठी म्हणून दावडी गावात पानिपत शौर्य दिन म्हणून साजरा केला. यावेळी अमित गायकवाड, प्रवीण गायकवाड सुरेश डुंबरे, बाबासाहेब दिघे, संभाजी घारे, अनिल नेटके, भाऊसाहेब होरे राणीताई डुंबरेपाटील, पुष्पाताई होरे संतोष गव्हाणे तसेच अनेक शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री राम भक्ताची अयोध्या वारी

**चाकण :** पुणे शहरातील धनकवडी येथील श्री राम भक्त आणि बजरंग दलाचे संयोजक श्री विजय घायतिडक हे मोटरसायकलवर येत्या २२ जानेवारीला अयोध्येत होणा-या श्री रामलल्ला मंदिर प्राणप्रतिष्ठा महोत्सवात सहभागी होण्यासाठी पुण्य नगरीतुन शनिवारी दुपारी मार्गस्थ झाले,आज रोजी सकाळी १०वा.राजगुरुनगर शहराच्या बाह्यवळण मार्गावर त्यांची भेट घेतली असता, अयोध्या येथील या भव्यदिव्य कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी मोटरसायकलवर ही वारी करत असल्याचे त्यांनी सांगितले आज शिवनेरी गडावर जाऊन तेथील शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली तेथील माती एका कलशा मध्ये घेऊन अयोध्येतील या सोहळ्याला उपस्थित राहण्याचा मानस आहे ,आज रात्री काळाराम




मंदिर नाशिक येथे श्रीरामाचे दर्शन घेऊन पुढील प्रवासासाठी जाणार आहे, पुढील प्रवास, नाशिक, धुळे, इंदौर,झाशी मार्गे अयोध्येला २०जानेवारीला संध्याकाळ पर्यंत पोहचणार असल्याचे त्यांनी सांगितले,या रस्त्यांवरून जाणारे येणारे प्रवासी जय श्री राम ....या घोषणा देऊन प्रोत्साहन देत असल्याचे पहायला मिळत आहे .

# राज्यातील सर्व मंदिराची स्वच्छता करणार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**ठाणे**: राज्यातील सर्व मंदिरांमध्ये स्वच्छता करा, या मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत राज्याचे मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंदिराच्या साफसफाईची सुरूवात आज (शनिवार, 13 जाने) ठाण्यातील प्राचीन असलेल्या कौपिनेश्वर मंदिरापासून केली. मुख्यमंत्री यांनी स्वतः हातात झाडू घेवून व तद्नंतर पाण्याने मंदिरच्या सभामंडपाची तसेच परिसराची साफसफाई केली. तसेच २२ जानेवारी रोजी अयोध्येमध्ये होणाऱ्या राम मंदिर उद्घाटनाच्या पाश्वर्भूमीवर महापालिका हद्दीतील सर्व मंदिरे साफ करुन मंदिराना विद्युत रोषणाई करण्याच्या सूचनाही त्यांनी आयुक्त अभिजीत बांगर यांना दिल्या. तसेच टप्याटप्याने राज्यातील सर्व मंदिरांमध्ये स्वच्छता मोहिम हाती घेणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.


ठाणे महानगरपालिकेच्या सर्वंकष स्वच्छता मोहिमेत (ऊीस्र उ'ींल्ललॅ उेस्रंल्ललॅ) अंतर्गत आज नौपाडा-कोपरी प्रभाग समितीतील सर्व विभागांमध्ये स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली होती. महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली ही सर्वंकष स्वच्छता मोहीम सुरू आहे. या मोहिमेत आमदार संजय केळकर, माजी महापौर नरेश म्हस्के, माजी नगरसेवक सुधीर कोकाटे, संजय वाघुले, परिवहन सभापती विलास जोशी, महापालिका आयुक्त अभिजीत बांगर, आदी सहभागी झाले होते.

या मोहिमेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सहभाग घेवून ठाणे शहराच्या मध्यवती ठिकाणी असलेल्या ऐतिहासिक अशा कौपिनेश्वर मंदिरापासून मंदिराच्या साफसफाईला सुरुवात केली. मुंबई ठाणे परिसरात सर्वंकष स्वच्छता मोहिम राबविल्यामुळे मुंबई ठाण्यातील प्रदुषणाचे प्रमाण कमी झाले आहे. तसेच केंद्र सरकारने राष्टपती महोदयांच्या हस्ते महाराष्टाला स्वच्छतेतील प्रथम क्रमांक देवून गौरविले आहे ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब असल्याचेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी नमूद केले.


२२ जानेवारीला अयोध्या येथील श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त
लातूर आणि अयोध्या येथे
१ लाख
लाडूंचे वाटप
राजदंड
च्या
वर्धापनदिनास
हार्दिक शुभेच्छा!
डॉ. अनिलकुमार गायकवाड
सामाजिक सेवाकुंड
देणं समाजाचे... नातं विश्वासाचं
मा. अश्वजीतभैय्या गायकवाड
अध्यक्ष
प्रोफेसर डॉ. सुनील बळीराम गायकवाड
तज्ज्ञ सल्लागार, सेवाकुंड
शुभेच्छुक : सेवाकुंड, लातूर

महत्त्वाचे

## राज्यात करोनामुळे मागील २४ तासांत तीन रुग्णांच्या मृत्यूची नोंद



**पुणे :** राज्यात करोनामुळे मागील २४ तासांत तीन रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. त्यात पुणे, सांगली आणि ठाण्यातील प्रत्येकी एका रुग्णाचा समावेश आहे. या तिन्ही रुग्णांनी करोना लशीच्या दोन मात्रा घेतल्या होत्या, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाने सोमवारी दिली.

पुण्यातील करोना रुग्णाचा मृत्यू १२ जानेवारीला खासगी दवाखान्यात झाला असून, त्याचे वय ४९ वर्षे होते. तसेच त्याला स्तनाचा कर्करोग, न्यूमोनिया आणि सेप्टीसीमिया आदी आजार होते. ठाण्यातील करोना रुग्णाचा मृत्यू ११ जानेवारीला शासकीय रुग्णालयात झाला असून, त्याचे वय ७३ वर्षे होते. त्याला मधुमेह आणि रक्तदाब हे आजार होते. सांगलीतील करोना रुग्णाचा मृत्यू १३ जानेवारीला शासकीय दवाखान्यात झाला असून त्याचे वय ५९ वर्षे होते. त्याला कोणत्याही सहव्याधी नव्हत्या. या तिन्ही रुग्णांनी करोना लशीच्या दोन्ही मात्रा घेतल्या होत्या, अशी माहिती आरोग्य सहसंचालक डॉ. आर.बी. पवार यांनी दिली.

राज्यात ३५ नवीन रुग्ण

राज्यात मागील २४ तासांत करोनाच्या ३५ नवीन रुग्णांचे निदान झाले असून, ६० रुग्ण रुग्णालयातून बरे होऊन घरी गेले आहेत. राज्यात रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९८.१७ टक्के असून, मृत्युदर १.८१ टक्के आहे. राज्यात मागील २४ तासांत २ हजार ३८२ चाचण्या झाल्या. राज्यातील पॉझिटिव्हिटी दर १.४६ टक्के आहे, असे डॉ. पवार यांनी सांगितले.

# राहुल नार्वेकरांच्या निकालाविरोधात ठाकरे गटाची सर्वोच्च न्यायालयात धाव



आमदार अपात्रता प्रकरणात राहुल नार्वेकर यांनी शिंदे गटाच्या आमदारांना पात्र केल्याने ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

आमदार अपात्रता प्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी १० जानेवारी रोजी महत्त्वाच्या निकालाचं वाचन केलं. त्यानुसार, ठाकरे आणि शिंदे गटातील आमदार अनपेक्षितपणे पात्र ठरले असून खरी शिवसेना म्हणून शिंदे गटाला मान्यता देण्यात आली. त्यामुळे ठाकरे गट आक्रमक झाला आहे. याविरोधात कायदेविषयक लढाई लढण्याकरता त्यांनी आता सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले आहे. ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात या निकालाविरोधात याचिका दाखल केली असल्याचे वृत्त कायदेशीर वृत्तस्थळ असलेल्या लाईव्ह लॉने दिले आहे. दरम्यान, ठाकरे गटाने ऑनलाईन याचिका दाखल केली आहे.

मे २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने आमदार अपात्रता प्रकरण विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे सोपवलं. तसंच, मर्यादित कालावधीत याबाबतचा निकाल देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, या सुनावणीला जून महिन्याच्या अखेरीस प्रत्यक्षात सुरुवात झाली. परंतु, ही सुनावणी अखंडित होऊ शकली नाही. सुनावणीला वेग यावा आणि लवकर निकाल लागावा म्हणून ठाकरे गटाने पुन्हा सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले. त्यामुळे सर्वोच्च न्यायलयाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना पुन्हा मर्यादित काळात निकाल देण्याचे आदेश दिले. त्यानुसार, सुनावणी सुरू झाली. दोन्ही गटांचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर याप्रकरणी ३१ डिसेंबरपर्यंत निकाल लागण्याची शक्यता होती. परंतु, राहुल नार्वेकर यांनी पुन्हा वेळ वाढवून मागितला.

राहुल नार्वेकरांची मागणी सर्वोच्च न्यायालयाने मान्य केली आणि १० जानेवारीपर्यंत निकाल देण्याचे आदेश दिले. त्यानुसार, बहुप्रतिक्षित अशा या निकालाचं वाचन १० जानेवारी रोजी मुंबईतील विधानभवनात झाले. त्यानुसार, राहुल नार्वेकरांनी २०१९ सालची शिवसेनेची घटनादुरुस्ती अवैध ठरवून उद्धव ठाकरेंचं पक्षप्रमुख पदही अमान्य केलं. तसंच, १९९९ ची पक्षघटना आणि बहुमताच्या आधारे शिंदे गटच खरी शिवसेना असल्याचं मान्य केलं.

शिंदे गटाला खऱ्या शिवसेनेची मान्यता देताना राहुल नार्वेकरांनी शिंदे गटातील १६ आमदार पात्र ठरवले. तसंच, ठाकरे गटाच्याही १४ आमदारांनाही पात्र ठरवले आहे.

ठाकरे गटाने शिंदे गटाच्या १६ आमदारांना अपात्र ठरवण्यासाठी

# रश्मी ठाकरे सक्रीय राजकारणात उतरणार?; राज्यात स्त्री शक्ती संवाद यात्रा काढणार

**मुंबई -** राज्यात निवडणुकीचे वारे वेगाने वाहत आहे. त्यात शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतरउद्धव ठाकरेंच्याहातून पक्षाचे नाव आणि चिन्ह दोन्ही निसटले आहे त्यामुळे ठाकरे गट सर्वच पातळीवर विरोधकांवर प्रहार करण्याची रणनीती आखत आहे. त्यात प्रामुख्यानेउद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे राज्यभरात दौरे करत आहेत. पक्षाच्या शाखांना भेटी देत आहेत. त्यातच आता रश्मी ठाकरे यांनीही ठाकरे गटाची महिला आघाडी मजबूत करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. अलीकडच्या काळात ठाकरे गटातून नीलम गोऱ्हे, मनिषा कायंदे यांच्यासारखे प्रमुख चेहरेएकनाथ शिंदेंसोबतगेले. त्यामुळे महिला आघाडीची ताकद काहीशी कमी झाली. मात्र नवीन नेतृत्वासोबत ठाकरे गटाची महिला आघाडी भरारी घेण्याच्या तयारीत आहेत.

याबाबत ठाकरे गटाच्या उपनेत्या संजना घाडी म्हणाल्या की, आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सगळेच राजकीय पक्ष तयारीला लागलेत. त्यात उद्धव ठाकरे गटानेही महिला मतदारांची ताकद पाहून स्त्री शक्ती संवाद मोहिम हाती घेतली आहे. महाराष्ट्रातील २३ लोकसभा मतदारसंघातील महिला पदाधिकारी आणि महिला शिवसैनिकांशी चर्चा केली जाणार आहे. गद्दारी आणि गटतटाच्या राजकारणाची झळ पक्षाला कितपत पोहचली आहे. त्यात नव्या दमाने येणाऱ्या महिला कार्यकर्त्यांना जबाबदारी दिली जाणार आहे. अंगणवाडी सेविका, महिला बचत गट यांच्या प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे असं त्यांनी सांगितले.तसेच इंडिया आघाडीच्या घटक पक्षांच्या महिला पदाधिकाऱ्यांसोबतही



चर्चा साधली जाणार आहे. जेणेकरून महिला पदाधिकाऱ्यांचे मनोमिलन करणार आहेत. महिला आघाडीच्या याआधीच्या कार्यक्रमात रश्मी ठाकरेंचे मार्गदर्शन होते. परंतु रश्मी ठाकरे यांच्या नेतृत्वात आणि मार्गदर्शनात स्त्री संवाद यात्रा राज्यभरात आणि मुंबईतल्या शाखाशाखांमध्ये घेणार आहेत. रश्मी ठाकरे या सर्व मोहिमेवर लक्ष ठेवून असणार आहेत हे आर्वजून संजना घाडी यांनी नमूद केले. त्यामुळे रश्मी ठाकरे आगामी काळात सक्रीय राजकारणात उतरणार का अशी चर्चा आता सुरू झाली आहे.दरम्यान, १६ जानेवारी ते २० जानेवारी हा विदर्भात दौरा होईल. गडचिरोली ते विदर्भातील सर्व जिल्ह्यात आम्ही महिला पदाधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहोत त्यानंतर टप्प्याटप्प्याने हा दौरा राज्यभरात होईल. शिवसेनेच्या उपनेत्या विशाखा राऊत, ज्योती ठाकरे, संजना घाडी, किशोरी पेडणेकर, शीतल देवरुखकर अशा वेगवेगळ्या गटाने हा दौरा होईल अशी माहिती रंजना नेवाळकर यांनी दिली.

# कोल्हापुरातील महालक्ष्मी मंदिराच्या प्रस्तावित विकास आराखड्यास व्यापाऱ्यांचा विरोध



**कोल्हापूर :** करवीर निवासिनी महालक्ष्मी मंदिराच्या सुमारे एक हजार रुपये खर्चाच्या प्रस्तावित आराखड्यामुळे मंदिर परिसरातील व्यापाऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान होणार आहे. या आराखड्यामध्ये अनेक दोष आहेत. व्यापाऱ्यांना याआधी कथन केलेले पुनर्वसनाचे मुद्दे प्रस्तावित आराखड्यामध्ये अजिबात दिसत नाहीत. त्यामुळे या आराखड्याला व्यापारी वर्गाचा विरोध आहे, अशी माहिती महाद्वार व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष, भाजपचे माजी नगरसेवक किरण नकाते यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले की, गतवर्षी मार्च पासून जिल्हाधिकारी राहुल रेखावार या आराखड्यासाठी प्रयत्नशील आहेत. परिसरातील रहिवासी व व्यावसायिक यांच्या समवेत अनेकदा बैठका झाल्या. त्यावेळी सर्वांचा विचार करून सर्व सहमतीने आराखडा अंतिम करू असे जिल्हाधिकाऱ्यांनी आश्वासन दिल्याने आम्ही त्यावर विसंबून होतो. तथापि जो आराखडा समोर आला आहे; तो पाहता व्यापारी वर्गावर अन्याय होणार अशी भावना झाल्याने आराखडा राबवण्यास आमचा विरोध राहील.

### नवा आरखडा करावा

**यापुढे कोल्हापुरातील सर्व पालकमंत्री, मंत्री ,खासदार, आमदार आदी लोकप्रतिनिधींना भेटून आमच्या भावना मांडणार आहोत. मंदिर परिसराचा सर्व समावेशक नवा आराखडा तयार केला पाहिजे, अशी मागणी उपाध्यक्ष मनोज बहिरशेठ यांनी केली. यावेळी सचिव गौतम नागपूरकर, प्रशांत मेहता, दीपक हातगिने, विनीत कटके, ज्ञानचंद्र नेनवानी आदी उपस्थित होते.**

पर्यायाचा शोध घ्यावा


आराखडा तयार करताना देवस्थान समिती अथवा प्रशासनाकडे कोणत्याही स्वरूपाची तपशीलवार माहिती उपलब्ध नव्हती. परिसरातील इमारती वापरातील क्षेत्रफळ, रहिवासी, भाडेकरूची संख्या याची कोणतीच माहिती न घेता आराखडा बनवण्यात आला आहे. कोल्हापूर महापालिकेच्या दोन एकरातील कपिलतीर्थ मार्केट मध्ये पुनर्वसन शक्य असल्याने त्याचा विचार होणे गरजेचे आहे, असे असोसिएशनचे कार्याध्यक्ष जयंत गोयानी यांनी सांगितले.

**हजारोंवर गंडांतर**

आम्ही केलेल्या सर्वेक्षणामध्ये ५४८ युनिट असून सुमारे साडेतीन लाख चौरस फूट इतका जागेचा वापर होतो. थेट बाधित होणाऱ्यांची संख्या तीन हजारच्या वर असून अवलंबितांची संख्या सुमारे १५ हजार आहे. सर्व या प्रस्तावित आराखड्यामुळे बाधित होणार आहेत. सर्वांचा उदरनिर्वाह मंदिरावर अवलंबून असल्याने या सर्वांना हाकलून लावले. हे इतक्या मोठ्या जनतेवर थेट आघात करण्यासाठी आहे, असे मत भाजपचे माजी नगरसेवक, श्रीपुजक अजित ठाणेकर यांनी नोंदवले.

# माझा धागा पक्का, विरोधकांचा पतंग कापू : छगन भुजबळ

**येवला (नाशिक) :** आकाशात झेपावणारे पतंग हे अधिक उंचावर गेले पाहिजे. हे सर्व आपल्यालाच लोकांचे पतंग आहेत. ते कापण्याचा प्रश्नच येत नाही.माझा धागा पक्का आहे. मात्र येणाऱ्या निवडणुकीत जे आपल्या समोर विरोधक असतील त्यांचा पतंग या मतदारसंघातील जनतेच्या बळावर नक्कीच कापू, अशी प्रतिक्रिया राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली. मकरसंक्रांतीच्या निमित्ताने येवला येथे सोमवारी (दि.१५) पतंग उत्सवास भुजबळ यांनी हजेरी लावली. यावेळी त्यांनी पतंग उडविण्याचा मनमुराद आनंद लुटला.



यावेळी छगन भुजबळ म्हणाले की, गेल्या निवडणुकांमध्ये अनेक लोक आपल्या विरोधात उभे ठाकले होते. येवल्याच्या जनतेने मात्र त्यांचा धागा कापला आहे. येणाऱ्या निवडणुकीत ज्यांची इच्छा आहे. त्यांनी विरोधात लढावं. मतदारसंघातील जनता त्यांना घरचा रस्ता दाखवतील असा खोचक टोलाही त्यांनी विरोधकांना लगावला. जनतेच्या विश्वासाचा धागा पक्का असल्याने माझा धागा कायम राहणार असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, भुजबळ यांच्याकडून तिळगुळ वाटप करण्यात आले. चित्रकार संतोष राऊळ यांनी मंत्री छगन भुजबळ यांना त्यांचे चित्र रेखाटलेला पतंग भेट दिला. येवल्यात पतंगोत्सवाची धूम सुरू असून काही दिवस हा उत्सव रंगणार आहे.

# पुण्यातही आता सर्वंकष स्वच्छता, मुख्यमंत्र्यांचे आदेश

## पाण्याने धुतले जाणार शहरातील रस्ते



**पुणे:** मुंबई आणि ठाणे शहराच्या धर्तीवर पुणे शहरातही सर्वंकष स्वच्छता (डीप क्लीनिंग) केली जाईल. त्यामध्ये धार्मिक स्थळे, तीर्थक्षेत्रांच्या स्वच्छतेबरोबरच रस्ते, पदपथ, दुभाजक आदी स्वच्छ करून पाण्याने धुण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे, येत्या आठवडाभरात या स्वच्छतेला सुरुवात करावी, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुणे महापालिकेला दिले आहे.

राज्यातील धार्मिक स्थळांमध्ये स्वच्छता अभियान राबविणे, शहरी आणि ग्रामीण भागातील डीप क्लीनिंग मोहीम आणि महिला सशक्तीकरण अभियान याविषयीची आढावा बैठक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली.

याला पुणे महापालिकेचे आयुक्त विक्रम कुमार, अतिरिक्त आयुक्त डॉ.कुणाल खेमनार, घनकचरा विभागाचे उपायुक्त संदीप कदम यांच्यासह महापालिकेच्या सर्व विभागांचे उपायुक्त ऑनलाइन सहभागी झाले होते. अतिरिक्त आयुक्त डॉ.कुणाल खेमनार यांनी ही माहिती दिली.

# राजू शेट्टींना काय वाटते महत्वाचे नाही, आमचा नेता हा शेतकरी, बुलढाणा लोकसभा लढवणारचे : रविकांत तुपकर

**मुंबई :** स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी काय वाटते ते महत्वाचे नाही. कारण मी जरी स्वाभिमानी संघटनेत असलो तरी माझा नेता हा गावगाड्यातील शेतकरी असल्याचे वक्तव्य स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी केलं आहे. मी बुलढाणा लोकसभा निवडूक लढवणार आणि जिंकून येणार असल्याचा विश्वास तुपकरांनी व्यक्त केला. ते लातूरमध्ये आले होते, त्यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. बुलढाणा लोकसभा मतदारसंघाबाबत प्रश्न विचारला असता ते बोलत होते. १८ जानेवारीपर्यंत शेतकरी हिताचे निर्णय घ्या, अन्यथा मुंबई दिल्लीकडे जाणाऱ्या रेल्वे रोखू असा इशारा तुपकरांनी दिला आहे.

...तोपर्यंत ठीक ठिकाणी आंदोलन सुरुच राहणार

हे सरकार गावगाडा उध्वस्त करणारे आहे. शेतकरी हिताचा निर्णय जोपर्यंत सरकार घेणार नाही तोपर्यंत ठीक ठिकाणी आमचा आंदोलन असंच सुरू राहणार असल्याचे राजू शेट्टी म्हणाले. येत्या काळामध्ये राज्यातील रेल रोको करायचा आमचा निर्णय आहे. नेत्यांना गावबंदी करण्यात येणार असल्याचा इशारा लातूर जिल्ह्यातील औसा येथे पार पडलेल्या शेतकरी आणि निराधार महिला मोर्चामध्ये रविकांत तुपकर यांनी दिला आहे.

सरकारला शेती आणि शेतकऱ्याच्या प्रश्नाचे गांभीर्य राहिले नाही

आज औसा येथे शेतकरी महामोर्चाच आयोजन करण्यात आलं होतं. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात हा मोर्चा आयोजित करण्यात आला होता. या मोर्चासाठी जिल्हाभरातून मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते आणि शेतकऱ्यांनी औसा इथे हजेरी लावली होती. मागील अनेक दिवसापासून शेतकरी हिताचे निर्णय होताना दिसत नाहीत. सरकारला शेती आणि शेतकऱ्याच्या प्रश्नाचे गांभीर्य राहिले नाही. यामुळे गावगाडा उध्वस्त होत आहे. शेतमालाला भाव नाही. सोयाबीन आणि कापसाचा दरावरून आपणास हे लक्षात येईल. पाण्याचा आणि विजेचा प्रश्न गंभीर आहे. विम्याची रक्कम वेळेवर मिळत नाही. जो विमा मंजूर झालाय तो अत्यल्प आणि तुटपंजा आहे. आमच्या शेतमालाला योग्य भाव मिळाला तरच शेतकरी सक्षम होईल असे तुपकर म्हणाले.

लवकरात लवकर शेतकरी हिताचे निर्णय नाही घेतले तर राज्यभरात शेतकरी आक्रमक होणार आहे. १८ जानेवारीपर्यंत सरकारनं निर्णय नाही घेतला तर मुंबई आणि दिल्लीकडे जाणाऱ्या राज्यातल्या सर्व रेल्वे आम्ही रोखून ठेवणार आहोत. याशिवाय शेतकऱ्यांकडे आता दुसरा पर्याय राहिला नाही. याची सरकारला जाणीव व्हावी म्हणून आंदोलन तीव्र होणार असल्याचे तुपकर म्हणाले.



**सरकारचा डोळा मतदारावर...**

शेतकरी प्रश्नावर सातत्याने सरकार गोड बोलत असते. मात्र, निर्णय घेण्याच्या वेळेस सरकार मतदार आणि ग्राहकांचा विचार करते. शेतमाल उत्पादक शेतकरी मेला तरी चालेल मात्र मतदार आणि ग्राहक जगला पाहिजे हे सरकारचे धोरण आहे. यामुळे शेतकऱ्यांना शेतमाला भाव मिळत नाही. संपूर्ण राज्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटना शेतकरी आणि विविध संघटनांना एकत्र घेत याच विषयाच्या अनुषंगाने आंदोलन करण्यात येणार आहे. १८ जानेवारी ही अंतिम तारीख असेल. अशी माहिती शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी दिली आहे.

आमचा नेता शेतकरी...

मागील एक महिन्यापासून औसा येथे महामोर्चाचा आयोजन सुरू आहे. आज मोर्चाही घेण्यात आला. मात्र राजू शेट्टी लातूर जिल्ह्यात असून मोर्चाला आले नाहीत. याबाबत रविकांत तुपकर यांना विचारले असता. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा मी कार्यकर्ता आहे. सर्वसामान्य शेतकरी हा आमचा नेता आहे. राजू शेट्टींबाबत मला माहित नाही. ते मोर्चाला का आले नाहीत हे त्यांनाच विचारा. संघटनेतील कार्यकर्ते आणि शेतकरी माझ्याबरोबर आहेत असे तुपकर म्हणाले.

**लोकसभा लढवणारच....**

**प्रत्येक वेळी राजू शेट्टी हे लोकसभा निवडणूक स्वतंत्र लढणार असे घोषित करतात. मात्र ऐनवेळी कोणाबरोबर तरी युती करून एक दोन जागेवर तडजोड करतात. माझ्या कार्यकर्त्यांना आणि मतदारसंघातील लोकांना मी काय सांगावे असा प्रश्न माझ्यासमोर पडतो. मात्र यावेळेस संपूर्ण ताकदीने लोक माझ्या पाठीमागे आहेत लोक वर्गणीतून निधी जमा केला आहे.**

**निवडणूक मी लढवणारच आणि जिंकणारच असा विश्वास रविकांत तुपकर यांनी व्यक्त केला. दोन राष्ट्रवादी काँग्रेस दोन शिवसेना आणि आता दोन स्वाभिमानी शेतकरी संघटना एकमेकांच्या समोर उभे ठाकल्या आहेत. रविकांत तुपकर यांच्या मोर्चाच्या वेळातच राजू शेट्टी जिल्ह्यात होते. काही काळ ते इथे थांबले आणि जालन्याकडे निघून गेले.**

# ‘महानंद’ मोडकळीस आल्याने राज्यात दूध अनुदान देण्यासाठी ‘गोकुळ’ ब्रॅण्ड निवडावा : हसन मुश्रीफ यांची सूचना

**कोल्हापूर :** कर्नाटक राज्यात नंदिनी शिखर संस्थेच्या माध्यमातून दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रति लिटर ५ रुपये अनुदान दिले जाते. महाराष्ट्र शासन असे अनुदान महानंदा शिखर संघाच्या माध्यमातून देण्याची योजना असली तरी हा संघ सध्या मोडलेल्या अवस्थेत आहे. त्यामुळे पर्याय म्हणून गोकुळ दूध संघ हा ब्रॅण्ड धरून दूध अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घ्यावा, अशी भूमिका वैद्यकीय शिक्षण तथा पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी सोमवारी येथे मांडली. गोकुळ दूध संघाने १७ लाख लिटर दूध संकलनाचा टप्पा पूर्ण केला आहे. या निमित्ताने कलश पूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



अमूल - नंदीनीशी स्पर्धा

आज संघाचे संस्थापक आनंदराव पाटील यांचा स्मृतिदिन असताना गोकुळने १८ लाख ४२ हजार लिटर दूध संकलन केले. ही गोकुळसाठी अभिमानाची बाब आहे, असा उल्लेख करून मंत्री मुश्रीफ यांनी गोकुळ समोर असणारी आव्हाने व संधी यांचा उहापोह केला. ते म्हणाले, गोकुळ समोर गुजरातचा अमूल आणि कर्नाटकातील नंदिनी या दूध संघांचे आव्हान आहे. मुंबईच्या बाजारपेठेत स्थान उंचावण्यासाठी गोकुळच्या फॅटमध्ये वाढ करावी, अशी सूचना दूध वितरकांनी केली असल्याने त्यानुसार नियोजन केले पाहिजे, अशी सूचना त्यांनी केली.

## कोल्हापुरात दूध थांबवा

**गेले महिनाभर गोकुळचे सरासरी दूध संकलन १७ लाख ६५ हजार लिटर होत आहे. पण आपल्याला २० लाख लिटर दूध संकलनाचे उद्दिष्ट गाठायचे आहे. याकरिता सर्व सुपरवायझरने लक्ष्यांक पूर्ण करण्याकडे लक्ष द्यावे. कोल्हापूर जिल्ह्यातून बाहेर जाणारे दोन लाख लिटर दूध जिल्ह्यात थांबावे किंबहुना ते गोकुळकडे वळवावे याकडे सर्वांनी अधिक लक्ष देणे गरजेचे आहे, असे आमदार सतेज पाटील म्हणाले. यावेळी खासदार संजय मंडलिक, माजी आमदार के .पी. पाटील यांची भाषणे झाली. गोकुळचे माजी अध्यक्ष विश्वास पाटील यांनी स्वागत केले. प्रास्ताविकात अध्यक्ष अरुण डोंगळे यांनी सत्ता आल्यापासून गोकुळचे दूध संकलन ५ लाख लिटरने कसे वाढले याचा प्रवास विशद केला.**

## पाचशे कोटीचे कर्ज

**गोकुळच्या म्हैस दुधामध्ये वाढ व्हावी यासाठी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेने ५०० कोटी रुपये कर्ज वितरण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यातून दूध संघाचे संचालक , अधिकारी, शेतकरी यांनी मोठ्या प्रमाणात म्हशी खरेदी केल्याने तीन लाख लिटर दूध वाढले आहे. अगदी उत्तर भारतात जाऊन म्हैस खरेदी करून शासनाच्या पशुधन अनुदान योजनेचा लाभ शेतकरी घेत आहेत, असे मुश्रीफ म्हणाले.**

# संक्षिप्त

## कार्यकर्त्यांनीच फिरवली महायुतीच्या जिल्हास्तरीय कार्यकर्ता मेळाव्यास पाठ

**सातारा :** साताऱ्याच्या गांधी मैदानावरील महायुतीच्या मेळाव्यात साताऱ्यातील दिगज नेत्यांची मांदियाळी होती. जिल्ह्यातले अनेक हे हेवीवेटआमदार खासदार असून सुद्धा कार्यकर्त्यांची गर्दी जमवता आली नाही. नियोजन अभावी महायुतीच्या मेळाव्यास प्रतिसाद मिळाला नाही. सातारा जिल्ह्यातील भाजपाच्या अनेक कार्यक्रमांना गर्दी होत असते. भाजपा आणि आणि मित्रपक्ष यांना समन्वय साधने गरजेचे असल्याचे दिसून येत होते. कार्यकर्ते व नागरिकांची उपस्थिती नगण्य होती.. मेळाव्याच्या निर्धारित वेळेनंतरही गांधी मैदानावरील खुर्च्या मोकळ्याच असल्याचे दिसून आले.

या मेळाव्या बाबत अनेक नेते मंडळींसह पदाधिकारी असलेल्यांनी फक्त स्वतःचेच फोटो प्रसिद्ध करून जाहिराती व फ्लेक्स बाजी केल्याने एकमेकांविषयी नाराजीचा सूर दिसून येत आहे. तर मेळाव्याच्या जाहिरातबाजीत युतीधर्म पाळण्याऐवजी आपले स्वतःचेच कौतुक करण्याच्या नादात मेळाव्याचा मात्र फज्जा उडाल्याची चर्चा होऊ लागली आहे.

भाजपाच्या दृष्टीने सातारा लोकसभेची जागा यावेळेस प्रतिष्ठेची असून असून मागील लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपाचे उमेदवार या ठिकाणी पराभूत झाले होते. मात्र २०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये सातारा लोकसभेची जागा भाजप लढवण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात आहे.

## माजी नगरसेविका निर्मला पिसे यांचे निधन



**म्हसवड :** म्हसवड नगरपरिषदेच्या माजी नगरसेविका सौ. निर्मला बाळकृष्ण पिसे यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ६३ व्या वर्षी निधन झाले.

निर्मला पिसे ह्या गत काही दिवसांपासुन आजारी असल्याने त्यांच्यावर उपचार सुरु होते, मात्र रविवार दि. १४ रोजी सायंकाळी ६ च्या दरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाचे वृत्त शहरात पसरताच सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. माण - खटावचे आमदार जयकुमार गोरे यांच्या त्या निष्ठावंत कार्यकर्त्या म्हणुन माणच्या राजकारणात त्या सुपरिचित होत्या, त्यांनी २०११ ते १६ या दरम्यान पालिकेत आ. गोरे यांच्या पार्टीतुन निवडुन येत पालिकेत महिला बालकल्याण सभापदी म्हणुन कार्यभार यशस्वी रित्या सभांळत म्हसवड पालिका हद्दीतील सर्व अंगणवाड्यांना प्रोत्साहन देण्याचे काम केले होते. त्यांच्या पश्चात पती, विवाहित दोन मुली व एक मुलगा असा परिवार आहे.

## भोळी येथे विदेशी दारूविक्री प्रकरणी परप्रांतीय युवकाविरुद्ध गुन्हा दाखल

**खंडाळा :** भोळी ता.खंडाळा गावच्या हद्दीत एका हॉटेलच्यामागील भितींच्या आडोश्याला विदेशी दारु विक्री केल्याप्रकरणी एका परप्रांतीय अब्दुल कुद्दस अन्सारी (वय ३१,सध्या रा.भोळी ता.खंडाळा मूळ रा.बागी ता.आईमा जि.इलाहाबाद राज्य उत्तरप्रदेश) दारुविक्रेत्याविरुध्द शिरवळ पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची शिरवळ पोलीसांनी दिलेली अधिक माहिती अशी की,भोळी ता.खंडाळा गावच्या हद्दीत एका हॉटेलच्या पाठीमागील बाजूस विदेशी दारुविक्री करण्यात येत असल्याची माहिती शिरवळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नवनाथ मदने यांना मिळाली. त्यानुसार शिरवळ पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी यांनी संबंधित ठिकाणी छापा टाकला असता संबंधित ठिकाणी अब्दुल अन्सारी हा परप्रांतीय युवक विदेशी दारु विक्री करीत असताना आढळून आला.यावेळी शिरवळ पोलीसांनी संबंधित युवकाकडून ३३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.याप्रकरणी अब्दुल अन्सारी याच्याविरुध्द शिरवळ पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेची पोलीस अंमलदार सुरज चव्हाण यांनी फिर्याद दिली असून अधिक तपास पोलीस अंमलदार रमेश फरांदे हे करीत आहे.

## प्रीतम मुंडेंच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब

**बीड :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या मित्रपक्षांचे जिल्हास्तरीय संमेलनाची सुरुवातच रविवारी (ता. १४) नाराजीचे झाली. व्यासपीठावरील बॅनरवर दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे छायाचित्र नसल्याने समर्थक संतप्त झाले. पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी राज्यपातळीवरुनच बॅनरचे डिझाईन निश्चीत झाल्याचे सांगून समजूत काढली. त्यानंतर मुख्य बॅनरच्या बाजूला दिवंगत मुंडेंचा डिजिटल फोटो लावण्यात आला.

भाजपसह महायुतीतल्या मित्रपक्षांनी उमेदवार डॉ. प्रीतम मुंडेच असतील, यावर शिक्कामोर्तब केले आणि हॅटट्रिकचाच विश्वासही व्यक्त केला. तर, भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांच्यासह भाजप आमदारांची अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरला. लोकसभा निवडणुकीत मित्रपक्षांतील नेते व पदाधिकाऱ्यांत सुसंवाद असावा, यादृष्टीने रविवारी (ता. १४) पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत महायुतीच्या पदाधिकाऱ्यांचा जिल्हास्तरीय मेळावा झाला.

खासदार डॉ. प्रीतम मुंडे, आमदार सोळंके, मेळाव्याचे समन्वयक अमरसिंह पंडित, आमदार बाळासाहेब आजबे, सुरेश नवले, भीमराव धोंडे, शिवसंग्रामचे प्रदेशाध्यक्ष तानाजी शिंदे, रमेश आडसकर, संजय दौंड, आर. टी. देशमुख, कुंडलिक खांडे, राजेंद्र मस्के, सचिन मुळूक, नारायण काशीद, अनिल तुरुकमारे, अशोक डक, सलीम जहांगीर, डॉ. योगेश क्षीरसागर, बबन गवते, मोहन जगताप, नारायण शिंदे, शिवाजी सिरसट, अविनाश नाईकवाडे आदींची उपस्थिती होती.

# पुण्याच्या बाबूराव चांदोरे फाउंडेशनला कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक

**सेवागिरी चषक मानकरी**

**वर्धनगड :** प पु श्री सेवागिरी महाराजांच्या यात्रेनिमित्त झालेल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धे तील अंतिम सामन्यात पुण्याच्या बाबूराव चांदोरे फाउंडेशन संघाने विजेतेपद पटकावले.




या स्पर्धेत २१ संघांनी सहभाग घेतला. प्रो कबड्डी, खेलो इंडिया तसेच राज्य व राष्ट्रीय पातळीवरील नामवंत खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी श्री सेवागिरी स्पोर्ट्स अकॅडमीचे अरुण मदने व आजी - माजी खेळाडू तसेच ग्रामस्थांचे सहकार्य लाभले. स्पर्धेचा बक्षीस समारंभ मठाधिपती सुंदरगिरी महाराज, चेअरमन रणधीर जाधव विश्वस्त डॉ सुरेश जाधव, बाळासाहेब जाधव, संतोष वाघ, सचिन देशमुख, गौरव जाधव, सुसेन जाधव,राजेश देशमुख, अंकुश पाटील,संदीपकाका जाधव,तात्यासाहेब जाधव,बाबू जाधव,वैभव जाधव, बिपीन भोसले आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

यात्रा स्थळावर झालेल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धाला क्रीडा प्रेमींची मोठी गर्दी होती. या कबड्डी स्पर्धेत अंतिम सामन्यात बाबूराव चांदोरे फाउंडेशन संघाने ठाणेच्या विठ्ठल क्रीडा मंडळा ला हरवून ५१ हजार रुपयांचे रोख बक्षीस व श्री सेवागिरी चषक पटकावला .उपविजेत्या संघाला चषक व ३१ हजार रुपयांचे रोख बक्षीस मिळाले. तृतीय क्रमांक चेतक स्पोर्ट्स क्लब पुणे संघाला २१ हजार व चषक तर चतुर्थ क्रमांक जॉली स्पोर्ट्स मुंबई संघाला चषक व ११ हजार रुपयांचे रोख बक्षीस मिळाले. या स्पर्धेत बेस्ट रेडर विक्रम जाधव, बेस्ट डिफेंडर सुरेश जाधव, मॅन ऑफ द मॅच आशिष पाडाळे तर बेस्ट प्लेअर चिन्मय गुरव हे खेळाडू पुरस्काराचे मानकरी ठरले.

# विवेकानंदांच्या जन्मदिनी विवेकी विचारांचा जागर करू : प्राचार्य कॅप्टन डॉ.महेश गायकवाड

**कराड :** विवेकानंदांनी जगभरामध्ये, भारताच्या आध्यात्मिक संस्कृतीची एक नवी ओळख करून देण्याचा प्रयत्न केला. बलशाली युवा भारताचे स्वप्न त्यांनी पाहिले. म्हणूनच विवेकानंदांचा जन्मदिवस राष्ट्रीय युवा दिवस म्हणून साजरा केला जातो. आज विवेकानंदांच्या जन्मदिनी विवेकी विचारांचा जागर करूयात त्याचबरोबर जिजाऊंना देखील नमन करून सदविवेक बुद्धीने कार्यप्रवण राहू असे प्रतिपादन प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांनी केले.

श्री स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊ जयंती निमित्त त्यांना अभिवादन करताना डॉ. महेश गायकवाड विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. यावेळी संत तुकाराम हायस्कूलच्या मुख्याध्यापिका अनिता भालेराव मॅडम, कमला नेहरू अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्य अनिता पोतदार आणि प्रॅक्टिसिंग स्कूलच्या होगले मॅडम प्रमुख उपस्थित होत्या.



**विवेकानंद जयंती दिनानिमित्त गुरूदेव कार्यकर्त्यांना संबोधित करताना प्र.प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड.**

विवेकानंद जयंती निमित्त कराड शहरातील 'विवेकानंद' शैक्षणिक संकुलाच्या वतीने कराड शहरात भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीची सुरुवात बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराड येथून सकाळ ८.३० वाजता झाली. महाराष्ट्र हायस्कूल, गणपती मंदिर, चावडीत चौक, आझाद चौक मार्गे ही रॅली बापूजी साळुंखे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यापर्यंत गेली. तेथे बापूजींना अभिवादन करून ही रॅली प्रभात टॉकीज मार्गे ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला मानवंदना देऊन ज्योतिबा मंदिर मार्गे भगवान मुरलीधर मंदिरापर्यंत गेली. तिथून ही रॅली लाहोटी कन्या प्रशाला मार्गे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अर्धाकृती पुतळ्याला मानवंदना देऊन चावडी चौक मार्गे पुन्हा महाविद्यालयात परतली.

सदर रॅलीत विवेकानंद शिक्षण संस्थेच्या कराड शहरातील सर्व शाखांमधील ४०० पेक्षा अधिक विद्यार्थी, विद्यार्थिनी, गुरुदेव कार्यकर्ते सक्रिय सहभागी झाले होते. जय जवान जय किसान, बापूजी साळुंखे यांचा विजय असो, विवेकानंद शिक्षण संस्थेचा विजय असो, अशा विविध घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला होता. ढोल ताशांच्या गजरात चैतन्यपूर्ण उत्साही वातावरणात सदर रॅलीचे सांगता झाली. सदर रॅलीत संत तुकाराम हायस्कूल, कमला नेहरू अध्यापक विद्यालय, प्रॅक्टिसिंग स्कूल, कराड व बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराड यांनी सहभाग नोंदवला.

# लोकसभेत महायुती ४५ प्लस ; केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे

**जालना :** आगामी लोकसभा निवडणुकांमध्ये राज्यात महायुती ४५ पेक्षा अधिक जागांवर विजय मिळवेल, असा विश्वास केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब दानवे यांनी व्यक्त केला आहे. राजूर रोडवरील शहरातील भारती लॉन येथे रविवारी (ता.१४) आयोजित महायुतीच्या जिल्हास्तरीय कार्यकर्ता मेळाव्याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी पालकमंत्री अतुल सावे, माजी राज्यमंत्री अर्जुन खोतकर, आमदार संतोष दानवे, आमदार नारायण कुचे, माजी आमदार अरविंद चव्हाण, भास्कर दानवे, बद्रीनाथ पठाडे, सिद्धिविनायक मुळे यांच्यासह महायुतीच्या नेते व पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री श्री. दानवे म्हणाले, की पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात महायुतीला महाराष्ट्रात मोठे यश मिळेल. महाराष्ट्रात ४५ हून अधिक जागांवर महायुतीचा विजय होईल. मध्यमवर्गीय, शेतकरी, कष्टकरी, महिला, युवा, आर्थिक दुर्बल या सर्व घटकांसह राज्यातील संपूर्ण समाज मोदींच्या नेतृत्वाखाली भारत देशाला जगात विकासाच्या बाबतीत अव्वल स्थानी नेण्यासाठी पाठीशी उभा आहे.

महायुतीच्या पक्षाकडे मोठ्या प्रमाणात पक्षप्रवेशासाठी इच्छुक आहेत. महायुतीत सगळे नेते दिसतील, विरोधात कुणीही दिसणार नाही, असे श्री. दानवे यांनी म्हटले. यावेळी माजी राज्यमंत्री अर्जुन खोतकर, माजी आमदार अरविंद चव्हाण यांचीही भाषणे झाली.

भाजपची बूथनिहाय बांधणी

महायुतीच्या जिल्हास्तरीय मेळाव्यात जालना लोकसभा मतदारसंघातून रावसाहेब दानवेंना उमेदवारी मिळणार असल्याचे जाहीर झाले आहे. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने भाजप आणि महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी तयारीला लागल्याचे चित्र आहे. शिवाय भाजपकडूनही बूथनिहाय बांधणी सुरू झाली.

# सिन्नरच्या दुष्काळ निवारणासाठी सर्वतोपरी मदत करणार; सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांचे सूतोवाच



**सिन्नर :** सिन्नर तालुक्याच्या पूर्व भागातील दुष्काळ निवारणासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल व त्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी केले.

पिंपरवाडी (यशवंत नगर) ग्रामपंचायतींतर्गत विकासकामांसाठी ६० लाखांचा निधी मंत्री चव्हाण यांच्या माध्यमातून मिळाला आहे. विकासकामांचे भूमिपूजन रविवारी (ता. १४) झाले. त्यावेळी ते बोलत होते.मंत्री चव्हाण म्हणाले, की पिंपरवाडी ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी सुचविलेली विकासकामे खरेतर अगदी किरकोळ आहेत. मात्र, मंत्री म्हणून लोकांची सेवा करण्याची संधी मी महत्त्वाची मानली.

वावी पंचक्रोशीतील समस्या सोडविण्यासाठी मंत्रिपदाच्या पलीकडे जाऊन मदत करण्याची आपली तयारी आहे. सिन्नर तालुक्यात असणारी दुष्काळी परिस्थिती विकासात अडसर निर्माण करणारी आहे.

त्यामुळे भविष्यात स्थानिक लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून व त्यांच्या सोबतीने दुष्काळ निवारणासाठी सरकार पातळीवर निश्चितच मदत केली जाईल.

सरपंच केशरबाई हाडोळे व त्यांच्या कुटुंबीयांशी असलेल्या व्यक्तिगत नात्यामुळे लहानशा गावात विकासकामांना निधी दिला आहे.

भविष्यातही गावाच्या विकासासाठी आपले योगदान असेल, याकडे श्री. चव्हाण यांनी लक्ष वेधले.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता प्रशांत औटी, नाशिकच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, कार्यकारी अभियंता उदय पालवे, उपाभियंता प्रवीण भोसले, शाखा अभियंता बाळासाहेब गिते, सागर मुंदडा, पोलिस उपनिरीक्षक बाळासाहेब आहेर, विठ्ठल राजेभोसले, भारत कोकाटे, विजय काटे, श्रीकृष्ण घुमरे, अशोक ताजने, ज्ञानेश्वर पांगरकर, सुनील शेळके, संजय शेळके, नीलेश जगताप, गणेश वेलजाळी, दीपक वेलजाळी, जालिंदर वाल्हेकर, काका वायकर, कन्हय्यालाल भुतडा, प्रशांत कर्पे, संतोष जोशी, सुनील काटे आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वितेसाठी उपसरपंच गणेश गायकवाड, माजी सरपंच संजय गायकवाड, विजय गायकवाड, कैलास काकड, रतन हाडोळे, सोमनाथ हाडोळे, श्रावण गायकवाड, सौरभ सातभाई, नाना गायकवाड, दर्शन घेगडमल, समाधान गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

# आमदार प्रणिती शिंदेंकडून आरोग्यमंत्र्यांना आंदोलनाचा इशारा!

**सोलापूर :** येथील सोलापुरातील गुरुनानक चौकातील जिल्हा रुग्णालयातील फर्निचरची निविदा प्रलंबित असून काम पूर्ण होण्यासाठी सहा महिने लागतील. तरीदेखील आरोग्य विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रुग्णालय ताब्यात घेतले. लोकसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून रुग्णालय खासगी संस्थेला देऊन सुरू करण्याची घाई सत्ताधाऱ्यांकडून सुरू असल्याचा आरोप आमदार प्रणिती शिंदेंनी पत्रकारांशी बोलताना केला आहे.

जिल्हा रूग्णालयात १०० खाटा सर्वच आजारांवरील रुग्णांसाठी तर १०० खाटा महिला व बालकांसाठी असणार आहेत. या रुग्णालयात कर्मचारी भरती करण्यासाठी खासगी कंपनीला कंत्राट देण्यात आले आहे. या कंपनीद्वारे बीएएमएस डॉक्टर, आशासेविका, नर्सेस, वॉर्ड बॉय, तंत्रज्ञ आणि सफाई कामगारांची भरती केली जाणार आहे. भरतीसाठी कोणतीही परीक्षा न घेता अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून कर्मचाऱ्यांना नियुक्ती दिली जात आहे. त्यामुळे या पदांसाठी पात्र असलेल्या उमेदवारांना सरकारी नोकरीपासून वंचित राहावे लागणार आहे.

तसेच या भरतीत कोटा आणि पॉइंट लिस्ट नसल्यामुळे, आरक्षणासाठी पात्र असलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना नोकरी मिळणार नाही. तसेच या रुग्णालयाचे खासगीकरण झाल्यास उपचारासाठी येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना औषधोपचारासाठी भरमसाट शुल्क मोजावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांच्या भरतीसाठी खासगी कंपनीला दिलेले कंत्राट तत्काळ रद्द करून नियमानुसार भरती व्हावी.

रुग्णालयाचे खासगीकरण करू नये, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला आहे. दरम्यान, आमदार प्रणिती शिंदे यांच्या आरोपांबाबत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

सोलापूर शहरातील गुरूनानक चौकात प्रशस्त असे २०० खाटांचे जिल्हा रूग्णालय झाले आहे. 'सकाळ'च्या वृत्तानंतर आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांनीही जिल्हा रुग्णालयाचा शुभारंभ जानेवारीतच होईल, असे यापूर्वीच स्पष्ट केले आहे. सध्या त्यादृष्टीने लगबग पाहायला मिळत आहे. रूग्णालयाची इमारत तयार असून सध्या लिफ्ट बसविण्याचे काम युद्धपातळीवर सुरु आहे.

# पंतप्रधान मोदी यांच्या विचारांचे ४८ खासदार लोकसभेत पाठवूया

## गांधी मैदानावरून खासदार उदयनराजे भोसले यांचे आवाहन

**सातारा :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खंबीर नेतृत्वामुळे जागतिक पातळीवर भारताची प्रतिमा उंचावली आहे त्यांच्या नेतृत्वाशिवाय सध्या भारताला पर्याय नाही महाराष्ट्रातील ४८ खासदार हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारांचे असावेत याकरिता महायुतीने महाराष्ट्रातून सर्व खासदार निवडून देण्याचे आवाहन खासदार उदयनराजे भोसले यांनी केले.

येथील गांधी मैदानावर महायुतीच्या वतीने आयोजित मेळाव्यात ते बोलत होते ते पुढे म्हणाले छत्रपती शिवरायांनी दिलेली सर्वधर्मसमभावाची शिकवण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या आचरणात आणली आहे जागतिक पातळीवर देशाचा असणारा धबधबा हा खासदार नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात गुणांमुळे आहे आम्ही महायुतीचे घटक पक्ष पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान निवडून देण्यासाठी एकत्र आलो आहोत सातारा व माढा लोकसभेच्या उमेदवारासह इतर लोकसभा



मतदारसंघातील ४६ खासदार हे मोदींच्या विचारांचे असावेत याकरिता आपापसातील मतभेद बाजूला ठेवून महायुतीच्या सर्व घटक पक्षांनी एकजुटीने काम करावे असे आवाहन त्यांनी केले

महाराष्ट्राच्या तिन्ही गटाच्या वरिष्ठ कार्यकारणीचे नेतृत्व जनतेच्या विकासाच्या मुद्द्यावर एकत्र आले आहे सातारा जिल्ह्यात सुद्धा महायुतीचे सर्व घटक पक्ष आणि आम्ही जनतेला विकास कामांच्या माध्यमातून चांगले जीवन स्तर मिळावे याकरता आम्ही प्रयत्न करत आहोत त्याकरता महायुतीच्या घटक पक्षांनी लोकसभेचे यापुढील काम एकजुटीने करावे असे उदयनराजे म्हणालेयावेळी पालकमंत्री शंभूराज देसाई, खा. श्री. छ. उदयनराजे भोसले, आ. शिवेंद्रराजे भोसले, आ. मकरंद पाटील, आ. जयकुमार गोरे, आ. महेश शिंदे, आ. दीपक चव्हाण, जिल्हा बँक अध्यक्ष नितीन पाटील, कराड उत्तरचे नेते मनोज घोरपडे, माजी आ. नरेंद्र पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, जिल्हाध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, सातारा लोकसभा प्रभारी डॉ. अतुल भोसले, डॉ. दिलीप येळगावकर, राष्ट्रवादी कार्याध्यक्ष अमित कदम, शिवसेना जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम जाधव, चंद्रकांत जाधव, जयवंत शेलार, आनंदराव पाटील, रिपाइं आठवले गटाचे जिल्हाध्यक्ष अशोक गायकवाड, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह मुकुंद सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना धैर्यशील कदम म्हणाले, ऐतिहासिक गांधी मैदानावर महायुती मेळावा होत आहे. आपण ऐतिहासिक निर्णय घेण्यासाठी जमलो आहे. सातारा लोकसभा खासदार हा नरेंद्र मोदींना पाठिंबा देणारा असावा असे सांगितले. अशोक गायकवाड म्हणाले, रामदास आठवले ज्यावेळी काँग्रेसमध्ये असताना काँग्रेसची सत्ता होती. आता ते युती बरोबर असून आता युतीची सत्ता आहे. आता आम्ही जातो मनापासून काम करत असून आम्ही प्रामाणिक आहे. आम्हाला सन्मान द्या. गृहीत धरू नका सोबत घ्या असे ते म्हणाले.

संजीवराजे नाईक निंबाळकर म्हणाले, विशिष्ठ हेतून महायुती सभा घेत असून एकत्र आलो आहे. देशात मोदी कार्य करत असून पुढे नेण्यासाठी काम करत आहे. त्यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी सातारा लोकसभा खासदार असावा. ३७० कलम यासह अन्य ऐतिहासिक निर्णय घेतले आहेत. मतभेद बाजूला ठेवून विकासासाठी एकत्र आलोय. महायुती बरोबर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष काम करणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सरकार राज्यात चालत आहे.

आ. महेश शिंदे म्हणाले, मोदींना पुन्हा पंतप्रधान करायचे आहे. प्रामाणिक, पुढे नेणारा आणि शत्रूला छातीठोक उत्तर देणारा असला पाहिजे. महिलांसाठी योजना राबवण्यात आले आहेत. गोरगरीब जनतेला न्याय देण्यासाठी काम केले आहे. शेतकऱ्यांना एकही रुपया मिळत नव्हते त्यांना ६ हजार केंद्र, ६ हजार राज्य असे अनुदान मिळत आहे. शोशिताना न्याय दिला जात आहे. जिल्ह्यात सिंचनासाठी प्रचंड निधी आला आहे. ज्या नेत्यांमुळे जीवन सुसह्य झाले तेच सरकार देशात येण्यासाठी काम केले आहे. कोणीही स्वतचं स्वार्थ ठेवायचा नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी होणार संकलप करूयात. लोकसभा उमेदवारास ताकद देणार आहे.

# इंदोलीतील ४० वर्षीय जवानास वीरमरण

## शासकीय इतमामात सोमवारी होणार अंत्यसंस्कार

**उंब्रज :** कराड तालुक्यातील इंदोली येथील जवानास वीरमरण प्राप्त झाले आहे.भोपाल येथे उपचार सुरू असताना रविवारी सकाळी त्यांचे निधन झाले.महेशकुमार कृष्णत संकपाळ ४० असे वीरमरण प्राप्त झालेल्या जवानाचे नाव असून या घटनेने इंदोली पंचक्रोशीवर शोककळा पसरली आहे. सोमवारी दुपारी शासकीय इतमामात इंदोली येथे अंत्यसंस्कार होणार आहेत.



याबाबत इंदोली येथील त्यांच्या नातेवाईकांकडून सांगण्यात आलेली माहिती अशी की, महेशकुमार कृष्णत संकपाळ हे सैन्य दलातील एस.एस.डी सीमा सुरक्षा दलात गेल्या १४ वर्षांपासून सेवा बजावत होते. मात्र गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर प्रकृती अस्वास्थ्यामुळे भोपाल येथे उपचार सुरू होते. रविवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास त्यांना वीरमरण आल्याचे रुग्णालयात उपचार सुरू असतानाची बातमी इंदोली येथे समजल्यानंतर कुटुंबीयांवर एकच आघात कोसळला. सोमवारी सकाळी त्यांचे पार्थिव इंदोली येथे आणले जाणार असून त्यानंतर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. जवान महेशकुमार संकपाळ यांचे ग्रामपंचयाती शेजारी घर असून त्यांना दोन लहान मुले आहेत. मोठा मुलगा इयत्ता पहिलीत शिकतो. तर दुसरा तीन वर्षाचा आहे. त्यांच्या पश्चात आई-वडील पत्नी दोन मुलं भाऊ-बहीण असा परिवार आहे. सैन्य दलात१४ वर्षे सेवा पूर्ण झाली असून आणखी सात वर्षे ते सैन्य दलात कार्यरत राहणार होते मात्र पूर्वीच त्यांना वीरमरण प्राप्त झाले.

# शूरवीरभूमी कण्हेरखेडला पनिपत शौर्य दिवस सोहळा उत्साहात

**कोरेगाव :** पानिपतचा इतिहास हा अभिमाने छाती फुगावी असा असून पानिपतवर लढलेल्या प्रत्येक वीरांचा इतिहास आहे. यात सर्व जाती धर्मातील लढवयांनी दिलेले योगदान विसरता कामा नये. कारण लढणार्या पाठीमागे बरेच मदत करणारे अदृश्य हात असतात त्याही वीरांना आपण विसरता कामा नये, पानिपतावर प्रत्येक उंबरा लढला आहे. आजच्या दिवशी मराठ्यांनी पानिपतच्या रणभूमीवर अब्दालीच्या विरोधात रणसंग्राम गाजविला आणि आपल्या भारताच्या सीमा निश्चित केल्या, असंख्य मराठे हुतात्मे झाले.पानिपत हा मराठ्यांचा जाज्वल्य इतिहास आहे मराठ्यांनी जपायलाच हवा असे प्रतिपादन प्रमुख वक्ते श्री. अॅड शिवाजीराव



देसाई यांनी केले.

कन्हेरखेड तालुका कोरेगाव येथे १७६१ रोजी पानिपतावर झालेल्या तिसर्या महायुद्धात धारातीर्थ पडलेल्या वीर योद्धांना मानवंदना देण्यासाठी म्हणून गौरवशाली शिंदे घराण्याचे गाव असलेल्या पानिपत शौर्य दिवसा निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमास कोल्हापुर विमातळाचे संचालक अनिल हरिभाऊ शिंदे, प्रमुख पाहुणे सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन नितीन काका पाटील, शिवव्याख्याते व इतिहास संशोधक एडवोकेट, विशेष पाहुणे इतिहास संशोधक, व्याख्याते डॉक्टर आबासाहेब पाटील, शिवाजीराव देसाई, सरपंच उपसरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य यासह कण्हेर खेड ग्रामस्थ, तसेच कोरेगाव पंचक्रोशीतील ग्रामस्थ, इतिहासप्रेमी, शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात बोलतांना कोल्हापुर विमातळाचे संचालक अनिल हरिभाऊ शिंदे म्हणाले की,आजच्या समाजातील तरुणपिढीने दत्ताजी शिंदे व महादजि शिंदे यांचा आदर्श घ्यावा बचेंगे तो और लढगें हे वाक्या ह्दयात ठेवावे.मराठ्यांच्या पानिपतावरील अपयशाने व याच लढाईत एका पायाने अपंगत्व आले असूच सुद्धा खचून जाता अवघ्या काहीवर्षातच दिल्लीची ज्यांनी सत्ता काबीज केले ते महादजी शिंदे यांचा आदर्श तरुणपिढीने घ्यावा.यासाठी सर्वप्रथम पालकांनी आपल्या पाल्याला सुरक्षित कोषातून बाहेर काढावे त्याला स्व अस्तित्व निर्माण करण्याच्या लढाईचे सिमोल्लंघन करु घ्यावं.हेच पानिपत शौर्य लढाईतून शिकावे लागेल.महेश पाटील बेनाडीकर यांनी आपल्या भाषणात अयोध्या तील रामजन्मभूमी मंदीर प्रभूश्रीराम मुर्ती प्रतिष्ठापना व महादजी शिंदे ऐतिहासिक संदर्भ देत म्हणाले की, ऐतिहासिक शिंदे घराण्यामुळे अयोध्येचे अस्तित्व अबाधित राहिले.

# तमाशासम्राज्ञी मंगला बनसोडे - करवडीकर यांची रोखठोक मुलाखत

**तमाशा हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. तमाशा या कलेतून केवळ मनोरंजन नव्हे तर प्रबोधन देखील केले जात असे. महाराष्ट्रात आज शेकडो तमाशा कलाकार आहेत. त्यांच्या आज अनेक समस्या आहेत. या सर्व समस्या सहन करून या कलाकारांनी आपली कला जगवली आहे. आजच्या काळात तमाशा कलावंतांच्या समस्या काय आहेत? आजच्या काळात या कलेसमोर काय आव्हानं आहेत? यासंदर्भात ज्येष्ठ तमाशा कलावंत मंगला बनसोडे यांच्याशी तासगांवचे पत्रकार मिलिंद पोळ यांनी केलेली रोखठोक बातचीत..**

**...(भाग -पहिला)**

तासगाव तालुक्यातील सावळज येथे श्री सावळसिद्ध विकास सोसायटीच्या शताब्दी महोत्सवानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ७ जानेवारीला सुप्रसिद्ध तमाशा कलावंत मंगला बनसोडे करवडीकर यांच्या लोकनाट्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. सावळजचे माजी सरपंच योगेश पाटील हे उत्तम कला समीक्षक आहेत. त्यांनी सकाळीच मला मंगला बनसोडे येणार असल्याची कल्पना दिली. लोकनाट्य तमाशा या विषयाबद्दल मला फार पूर्वीपासून एक वेगळेच कुतुहल आहे. कारण आमचा सावळज गाव ही तमाशा कलाकारांची पंढरी मांडली जाते. मंगलाताई बनसोडे यांची मुलाखत घेण्याचा योग आला. सुमारे दीड ते दोन तास चाललेल्या मुलाखतीमध्ये मंगलाताईंनी त्यांच्या आयुष्यातील अनेक कडू - गोड आठवणी तसेच तमाशा क्षेत्रातील व्यथा मांडल्या. ज्याचं वर्णन मी आपल्यासमोर जसेच्या तसे मांडण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे.

**मी (मिलिंद पोळ )-** नमस्कार, महाराष्ट्राची संस्कृती असणाऱ्या लोककलेची गेली पाच दशकाहून अधिक काळ आपण सेवा करत आहात. आपल्या लोककलेचा प्रवास कधी व कसा सुरू झाला?

**मंगला बनसोडे -** १२ सप्टेंबर १९५१ साली पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथे माझा जन्म झाला. माझे पंजोबा नारायण खुडे यांच्यापासून आमच्या घराण्यात तमाशाची परंपरा सुरू आहे. माझे वडील भाऊ मांग व आई विठाबाई मांग नारायणगावकर यांच्याकडून मला लोककलेची शिकवण मिळाली. वयाच्या सातव्या वर्षी मी तमाशाच्या फडावर पायात चाळ बांधून नाचले.

**मी (मिलिंद पोळ) -** पूर्वीच्या काळात तमाशा गावोगावी पोहोचण्यासाठी कोणत्या साधनांचा वापर केला जात असे. तसेच त्या काळात रसिकांची मागणी काय असायची.?

**मंगला बनसोडे-** माझ्या पपणजोबा पासून सुरू झालेली तमाशाची परंपरा आज माझी पाचवी पिढी माझा मुलगा नितीन बनसोडे सांभाळत आहे. पूर्वीच्या काळात








दळणवळणासाठी मोटर गाडी हा प्रकार नव्हता. त्यामुळे या गावातून त्या गावात कार्यक्रमाला जाण्यासाठी बैलगाडीचा वापर केला जात असे. बैलगाडी पासून सुरू झालेला माझा तमाशा प्रवास वातानुकूलित दहा ट्रॅव्हल्स पर्यंत पोहोचण्यासाठी मी खूप कष्ट उपसले आहेत. तमाशा करताना समोर बसलेले रसिक हेच आमचे मायबाप असतात. त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आम्ही आमच्या मनाच्या वेदना कधीच चेहऱ्यावर उमटू देत नाही. आयुष्यात मी अनेक दुःखी पचवली आहेत. पाठीवर आभाळा एवढं दुःख असतानाही स्टेजवर पायात १५ - १५ किलोचे चाळ बांधून नाचले आहे. त्या काळातील रसिक हे कला बघण्यासाठी यायचे. कलेची कदर असणारे श्रोते पोटभर खायला पुरेल इतके धान्य द्यायचे. तसेच बिदागी ही जेमतेम असायची. परंतु त्या काळातील रसिक हा वेगळाच होता. आज-काल मुलांच्या मध्ये मोबाईलचं भयंकर वेड आल आहे. साहजिकच मुलं दिवसभर युट्युब आणि रिल्स बघून तमाशा कलावंतांकडूनही तशाच प्रकारची मागणी करत असतात. परंतु कला हेच जीवन हे व्रत स्वीकारूनच मी या कलेची सेवा आज वयाच्या ७२ व्या वर्षापर्यंत करत आली आहे.

**मी (मिलिंद पोळ)-** विठाबाई नारायणगावकर यांची कन्या म्हणून तुम्ही तमाशाला सुरुवात केली होती. तो प्रवास मंगला बनसोडे करवडीकर असा केव्हा व का सुरू झाला.?

**मंगला बनसोडे -** खरंतर पूर्वी तमाशामध्ये स्त्रीपात्र हा प्रकार नव्हताच. आमच्या कुटुंबातुन माझी आई विठाबाई नारायणगावकर हीने पायात चाळ बांधले. पण त्याला कारणही अगदी तसंच होतं. माझे आजोबा भाऊ बापू मांग यांचा सातारा जिल्ह्यातील पुसेगाव येथे तमाशाचा फड सुरू होता. त्यांच्या दुसऱ्या बाजूला शालन अकलेकर यांचाही तमाशा सुरू होता. अकलेकर यांच्या तमाशा मध्ये स्त्री नृत्यांगना असल्यामुळे रसिक श्रृत्यांची त्या तमाशाला तुफान गर्दी होती. परंतु हाडाचा मोठा कलावंत असणाऱ्या भाऊ बापू मांग यांच्या तमाशाकडे लोकांनी पाठ फिरवली. परिणामी भाऊ बापूंना हा फार मोठा अपमान वाटला. आपल्या वडिलांचा झालेला हा अपमान विठाबाईंनी उघड्या डोळ्यांनी पाहिला. आणि त्यांनी ठरवलं की आपण पायात चाळ बांधून हा तमाशा फड पुढे सुरू ठेवायचा. त्यावेळी विठाबाई नारायणगावकर यांनी पायात चाळ बांधून तमाशा स्वतःच्या नावाने सुरू केला. त्यानंतर मात्र नारायणगावकर यांच्या तमाशा ने पाठीमागे वळून कधी पाहिलेच नाही. भाऊ बापू मांग यांना तीन मुली होत्या. विठाबाई, मनोरमा व केशरबाई. या तिन्ही मुली व भाऊ बापू मांग यांनी मिळून तमाशासृष्टीमध्ये मोठा इतिहास घडवला. पुढे १९५८- ५९ मध्ये नारायणगावकर तमाशा ची संपूर्ण सूत्रेच विठाबाई नारायणगावकर यांच्या हातात आली. त्यांनी महाराष्ट्र बरोबर देशभर आपला नावलौकिक मिळवला. त्यांच्याच फळात कथा पटकथा लेखक असणारे रामचंद्र बनसोडे यांच्यासोबत माझा (मंगला) विवाह झाला.

दरम्यान सात आठ वर्षानंतर काही घरगुती कारणास्तव भाऊ वडिलांशी झालेले वैचारिक मतभेद यातून रामचंद्र बनसोडे व मी यांनी नवीन तमाशा फड उभा करण्याचे ठरविले. यावेळी रामचंद्र बनसोडे यांनी त्यांची करवडी येथील वडलार्जीत जमीन विकून २५ हजाराचे भांडवल उभे केले. माझा मुलगा व मी यांचा तिथूनच प्रवास सुरू झाला सौ. मंगला बनसोडे व मास्टर नितीन कुमार बनसोडे करवडीकर लोकनाट्य तमाशा मंडळ १९८२ मध्ये सुरु केले.

**मी (मिलिंद पोळ) -** नवीन तमाशा फड उभा करून तो चालवणे व टिकवणे हे तुम्ही कसे जमवले.? यासाठी तुम्हाला कोणाकोणाची मदत झाली.

**मंगला बनसोडे:** वयाच्या सातव्या वर्षापासून मी तमाशा फडात आई विठाबाई सोबत काम करत होती. नंतरच्या काळात आईच्या तमाशा व्यवस्थापनाचे सर्व काम मीच पाहत होते. या अनुभवाचा मला मी स्वतःचा फड उभारल्यानंतर खूप मोठा फायदा झाला. माझे पती रामचंद्र बनसोडे यांनी स्वतःची जमीन विकून हा तमाशा फड उभा केला होता. याची मला वेळोवेळी जाण होत होती. १९७६ मध्ये कवठेमंकाळ येथे तमाशाचा फड सुरू असतानाच मला प्रसूती वेदना सुरू झाल्या स्टेजच्या पाठीमागे उभा असणाऱ्या राहुट्यामध्ये माझा मोठा मुलगा नितीन याचा जन्म झाला. माझा तमाशा फड सुरू झाला तेव्हा महाराष्ट्रात दत्ता महाडिक, अमन चांदे, तुकाराम खेडकर, गुलाब बोरगावकर असे अनेक मोठे तमाशा फड प्रसिद्ध होते. माझे पती रामचंद्र बनसोडे हे मोठे लेखक होते. सत्य घटनेवर आधारित वग नाट्य लिहिण्याचा त्यांचा हातखंडा होता. त्यांनी लिहिलेल्या तांब्याचा विष्णू बाळा या वगनाट्य नंतर आमचा तमाशा फड महाराष्ट्रात नावारूपाला आला. विष्णु बाळा व बापू बिरू वाटेगावकर या वगनाट्यला खूप प्रसिद्धी मिळाली. महाराष्ट्रात आमच्या तमाशा फळाला मोठी मागणी होवू लागली. तमाशा या कलाक्षेत्रात काम करत असताना तत्कालीन दिवंगत मुख्यमंत्री विलासराव देशमुख व तत्कालीन दिवंगत गृहमंत्री आर आर आबा पाटील यांचा फार मोठे योगदान आम्हाला मिळाले. तमाशाची वेळ बारा वाजेपर्यंत वाढवून देण्याचे मोठे काम स्वर्गीय आर.आर. आबा यांनी केले. तमाशा फडात झालेला एका मोठ्या घटनेनंतर आर आर पाटील यांनी मोठी मदत करत दिलासा दिला होता. ही मंडळी फार मोठ्या मनाची व संवेदनशील होती.

**मी (मिलिंद पोळ)** आज-काल समाजामध्ये लावणी शोची वाढती मागणी लक्षात घेता तरुणांची ते आकर्षण बिंदू ठरत आहेत. याचा फटका तुमच्या लोकनाट्याला बसतो का?

**मंगला बनसोडे:** खरंतर डीजे च्या तालावर जे स्टेज शो सध्या समाजात सुरू आहेत. ते फक्त लोकांना आकर्षित करू शकतात कला दाखवू शकत नाहीत. कारण कुठेतरी प्रेक्षकांना मनोरंजनाच्या नावाखाली अश्लील हावभाव दाखवून महाराष्ट्राची सामाजिक व सांस्कृतिक संस्कृती बिघडवण्याचे काम सध्या सुरू आहे. लावणी हा तमाशाचा आत्मा आहे. आणि सामान्य रसिक लावणी बघण्यासाठी आधी लोकनाट्याचीच मागणी करतो. गावागावांच्या यात्रांचे प्रमुख आकर्षण आजही तमाशा व कुस्त्यांचा फड हेच आहे. तमाशा या प्रकाराला पांढरपेशा समाजाने बदनाम केले आहे. वास्तविक म्हणजे समाज माध्यमांमध्ये व आजकाल येणाऱ्या चित्रपटांमध्ये काय दाखवले जाते याकडे हा पांढरपेशा समाज डोळे झाकून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतो. व तमाशाला मात्र बदनाम केले जाते हे निश्चितच दुर्दैव आहे. तमाशा ही लोककला महाराष्ट्राची खरी ओळख आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून या कलेला राजाश्रय मिळाला आहे. त्या काळात तमाशा कलावंत गुप्तहेरचे काम करत होते. असंही सांगितलं जायच.

परंतु सध्याच्या स्टेज शोमुळे व मोबाईल मुळे लोकनाट्य तमाशाला मोठा फटका बसत आहे. हल्लीची तरुणाईला महाराष्ट्राचा सांस्कृतिक वसा आणि वारसा समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. तमाशा कला जोपासत असताना हल्लीची तरुणाई कार्यक्रमामध्ये चित्रपटातील विविध गाण्यांची व शॉर्ट कपड्यातील नृत्याची मागणी करतात. आम्ही पण शक्य तितके रसिकांचे मनोरंजन करण्याचा प्रयत्न करत असतो. परंतु तमाशाचा आत्मा कला आहे. आणि कला हेच आमचे जीवन आहे.

**मी (मिलिंद पोळ)** तमाशा कलाकारांसाठी सरकार कडून कोणती मदत मिळते?

**मंगला बनसोडे -** छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून लोककलेला राजाश्रय मिळत होता. कलेची कदर करणारी जुनी पिढी आज हयात नाही. साहजिकच तमाशा कलावंतांची अपेक्षा राज्यकर्त्यांकडून असते. दोन वर्षापूर्वी कोरोना संकटात तमाशा कलावंतांची फार मोठी परवड झाली होती. तमाशाचे शो बंद असल्यामुळे कलावंतावर अक्षरशः उपासमारीची वेळ आली होती. त्या संकटाच्या काळात मी व अनेक तमाशा फड मालक राज्यकर्ते विरोधी पक्ष यांना भेटले. राज्यातील व केंद्रातील सर्व नेत्यांची भेट घेतली. देशाचे पंतप्रधान मोदी यांना सोडून मी सर्व राजकीय नेत्यांना भेटले परंतु कोणीही मदत केली नाही. कोरोनाचा संकट काळ हा पण आयुष्यातील आणखी एक मोठा संघर्ष होता. राज्य शासनाकडून तमाशा मंडळांना तीन वर्षांमध्ये आठ लाख रुपये अनुदान यापूर्वी मिळत होते. परंतु गेल्या अनेक वर्षापासून ते अनुदान सरकारकडून बंद करण्यात आले आहे. तमाशा कलावंत वयोवृद्ध झाल्यानंतर त्याच्यावर अनेकदा उपासमारीची वेळ येते. अनेक कलावंत व्यसनाधीन बनतात. आणि खरोखरच त्यांच्या आयुष्याचा तमाशा होऊन बसतो. ही मोठी शोकांतिका आहे. माझी राज्य शासनाकडे विनंती आहे त्यांनी तमाशा मंडळांना प्रतिवर्षी दहा लाख रुपये अनुदान द्यावे. लोककलावंतांना प्रति महिना दहा हजार रुपये पेन्शन द्यावी. कारण महाराष्ट्राची संस्कृती जोपासण्याचे फार मोठे काम तमाशा कलावंत करत आहेत. आज माझ्याच लोकनाट्य तमाशा मंडळात ११० हून अधिक कलाकार काम करतात. एका शोसाठी माझा कलाकारांचा पगार एक ते दीड लाखाच्या आसपास होतो. वर्षातील सात ते आठ महिने या कलाकारांना सांभाळावे लागते. प्रत्येक दिवशीच तमाशाचे कार्यक्रम असतात असे नाही परंतु कलाकारांना त्यांचा पगार द्यावा लागतो.

**मी (मिलिंद पोळ)-** तुम्ही प्रसिद्धीच्या शिखरावर असल्यामुळे तुम्हाला राजकारणात यावे असे वाटत नाही का?

**मंगला बनसोडे -** तमाशा कलावंतांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी जेव्हा मी राज्यकर्त्यांची उंबरे झिजवते. त्यावेळी मनात एक वेगळ्या प्रकारची निश्चितच चीड निर्माण होते. आम्ही कलाकार आहोत राजकारणी मंडळींसारखं खोटं नाट बोलायला आम्हाला जमत नाही. मला अनेक राजकीय पक्षांकडून वेगवेगळ्या ऑफर दिल्या गेल्या होत्या. परंतु माझ्या कुटुंबाचा सांस्कृतिक वारसा फार मोठा आहे. माझे आजोबा भाऊ मांग यांना भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते तमाशा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. तसेच माझी आई विठाबाई नारायणगावकर यांनाही तत्कालीन राष्ट्रपती सी. व्यंकटरमण यांच्या हस्ते राष्ट्रपती पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. २०१७ मध्ये भारताचे महामहीम राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते मला (मंगला बनसोडे) राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित आले आहे. माझ्या कुटुंबातील माझ्यासह तिघांना इतका मोठा सन्मान भारत सरकारकडून मिळाला आहे. हा सन्मान रसिकांच्या आशीर्वादामुळे मिळाला असे मी मानते. मी जिवंत असेपर्यंत तमाशाचा फड कधीच सोडणार नाही. त्यामुळे तमाशाची राहुटी हेच आपलं विश्व आहे. आणि कला हेच माझे जीवन आहे. रसिक परमेश्वराच्या ह्दयातील मिळालेले स्थान कोणत्याही राजकीय पदापेक्षा निश्चितच मोठे आहे.

**मिलिंद पोळ,सावळज**
**(तासगांव )**
**-९८९०७१०९९९**

# कोरेगाव जिजाऊंच्या प्रतिमेची शोभायात्रा उत्साहात



**कोरेगाव :** कोरेगाव येथे राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त आयोजित जिजाऊ महोत्सवात जिजाऊ प्रतिमा मिरवणूक तथा शोभायात्रा, कर्तृत्ववान महिलांचा पुरस्कार देऊन सन्मान, जिजाऊ वंदना, जिजाऊ महती वक्तृत्व सादरीकरण व बक्षीस वितरण समारंभ उत्साहात झाला.

कोरेगाव राजमाता जिजाऊ उत्सव समितीच्यावतीने हुतात्मा स्मारकासमोर सजवलेल्या रथात जिजाऊंच्या प्रतिमेस अभिवादन करून कोरेगाव नगरपंचायत नगराध्यक्षा सौ दीपाली बर्गे यांच्या शुभहस्ते श्रीफळ वाढवून मिरवणुकीस सुरुवात झाली.

यावेळी शहरातील विविध शाळांचे विद्यार्थी सहभागी झालेले होते. त्यामध्ये घोड्यावर छत्रपती शिवाजी महाराज घोड्यावर छत्रपती शिवाजी महाराज, जिजाऊ यांच्या वेशात बसलेल्या होत्या. सर्वांचे आकर्षण ठरल्या. शहरातून फिरून पुन्हा स्मारकात आल्यानंतर मिरवणुकीची सांगता झाली. तेथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा, राजमाता जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन डॉक्टर सौ प्रियाताई शिंदे यांच्या हस्ते झाले.जिजाऊ वंदना झाल्यावर आठ मुलींनी जिजाऊ महतीवर आधारित भाषणे केली. त्यानंतर कर्तृत्ववान महिला वंदना हरी फडतरे, जयश्री गजानन बर्गे, संगीता वीरकर, मंगला शामराव बर्गे, धनश्री संजय बर्गे यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. हिमगौरी प्रभाकर बर्गे या उपस्थित राहू न शकल्याने त्यांचा पुरस्कार त्यांचे वडील बाबूजी बर्गे यांनी स्वीकारला.यावेळी सौ प्रियाताई शिंदे यांच्यासह दीपाली बर्गे, सारिका शिदि यांनी मनोगत व्यक्त केले.

सी. आर. बर्गे यांनी प्रास्ताविक केले. या वेळी पृथ्वीराज बर्गे, अधिक बर्गे, अनिल जाधव, राजेश बर्गे, प्रशांत यादव, संतोष चिनके, दिलीप वेलीयावेट्टील, संजना जगदाळे, स्वाती बर्गे, मनीषा भोसले, संजना दुटाळ, रोहिणी बर्गे, संगीता बर्गे, गौरी बर्गे, अश्विनी माने आदी प्रमुखांसह विविध शाळांचे विद्यार्थी उपस्थित होते.

# ‘चलो मुंबई’ उंब्रज येथे मराठा आंदोलकांची मुक्कामाची सोय

## कर्नाटक, कोल्हापूर, सांगली भागातील मराठा बांधव जमणार

**उंब्रज :** २० जानेवारीपासून मागे हटायचं नाही अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे.त्यासाठी मुंबईत आंदोलन केलं जाणार आहे.परंतु तो पर्यत चर्चेसाठी दारं खुली आहेत. २० तारखेपूर्वी सरकारला आरक्षण द्यावंच लागेल, असं मनोज जरांगे यांनी सरकारला ठणकावले आहे.अन्यथा महाराष्ट्राच्या सर्वच जिल्ह्यातील मराठा आंदोलक आरक्षण मिळवण्यासाठी पायी मुंबईला कूच करतील असा इशारा दिला आहे.याच पार्श्वभूमीवर सातारा जिल्ह्यातील मराठा समन्वयकांचे कर्नाटक,कोल्हापूर आणि सांगली येथून पायी चालत जाणाऱ्या बांधवांची शिरवळ ते कासेगाव दरम्यान मुक्काम, आंघोळ,जेवणखाण यांचे नियोजन करण्यासाठी बैठकांचे सत्र सुरू झाले आहे.उंब्रज ता.कराड येथे महामार्गालगत मुक्कामाचे ठिकाण नक्की झाले आहे.याबाबत दोन तीन ठिकाणांची चाचपणी करण्यात आली आहे.



मराठा आरक्षणासाठी मोठा लढा उभा राहिला आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत येऊन उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. मराठा आंदोलकांना त्यांनी आवाहन केलं आहे. जालन्यातील अंतरवली सराटी ते मुंबई अशी ही पदयात्रा असेल. विविध गावांमधून प्रवास करत मराठा आंदोलकांसह मनोज जरांगे पुणे मार्गे मुंबईत दाखल होतील.याच पार्श्वभूमीवर संपूर्ण महाराष्ट्रातील मराठा समाज पुणे येथे एकत्र येऊन नंतर मुंबईकडे कूच करणार असल्याची माहिती मिळत आहे.यामुळे ठिकठिकाणी पाणी,फळे,अन्नाची पाकिटे,अन्नदान अशी विनामूल्य सुविधा स्वयंसेवी व्यक्तीच्या वतीने पुरवली जाण्याची शक्यता आहे.यासाठी सातारा जिल्ह्यातील महामार्गालगत राहण्यासाठी सोय करण्याची चाचपणी सुरू आहे.

रोज वापरासाठी लागत असलेल्या वस्तू सोबत घेण्याचं आवाहन मनोज जरांगे यांनी आंदोलकांना केलं आहे. मुंबईत जाईपर्यंत जेवणाची व्यवस्था करावी लागणार नाही. मात्र तिथं गेल्यावर आपल्याला आपलं सामान बाहेर काढावं लागेल. शक्य असेल तर पाण्याचे टँकर, रुग्ण वाहिका सोबत घ्या. पीठ, सरपण, चुली, बादल्या, ताटं, तांब्या, कपडे चटई हे सगळं सोबत घ्या. रिक्षा, चारचाकी गाडीमधील मागील सिट काढून घ्या आणि झोपायची व्यवस्था करा, असं मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आंदोलकांना आवाहन केलं आहे.

भजन करणाऱ्या मंडळींनी, टाळकरी मंडळी यांनी यावं ही विनंती आहे. गावगावांतील हलगी पथक, गावागावातील गणपती मंडळाचे ढोल घ्यावेत. पोवाडे म्हणणारे, शिवशाहीर किंवा शिकणारे शिवशाहीर असतील तर ना नफा न तोटा तत्त्वावर यावे मनोबल वाढविण्यासाठी यावं. जागरण गोंधळ करणारे, भरुडकार यांनी सोबत यावे, असं आवाहन जरांगे पाटील यांनी केलंय. जो हॉटेल चालक ना तोटा ना नफा या तत्त्वावर कुणी स्टॉल टाकत असेल तर चालेल. सरकारने फक्त आंघोळीची आणि प्रातविधीची सोय करावी, असं जरांगे म्हणालेत.

खर्डा भाकरीची संकल्पना

उंब्रज ता.कराड मुक्कामाचे ठिकाण असणारे पंचक्रोशीतील समाज बांधव प्रत्येक घरातून चार भाकरी आणि खर्डा घेऊन येणार असल्याचे नियोजन उंब्रज परिसरात होत आहे.एक दिवस समाजासाठी ही भूमिका आहे. असेही मराठा समाजातील नागरिक बोलून दाखवत आहेत यामुळे हजारोंच्या संख्येने मराठा बांधव आले तर त्यांची राहण्याची व जेवणाची कोणतीही गैरसोय होणार नाही अशी खात्री जिल्ह्यातील समन्वयकांनी बोलून दाखवली.आर पारची लढाई असल्याने आता नाही तर कधीच नाही अशी भावना व्यक्त आहे.

# नगर शहरात साकारणार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा

**अहमदनगर:** अनेक वर्षांचा न्यायालयीन संघर्ष, आंदोलने व आंबेडकरी चवळीतील कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्यातून अखेर नगर शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा महापालिकेच्या माध्यमातून साकारणार आहे. शहरातील मार्केट यार्ड चौकातील आधीच्या पुतळ्याच्या जागीच १८ फुटी चबुतऱ्यावर १० फुटी पुतळा बसविण्यात येणार आहे. तसेच परिसरात सुशोभिकरणही करण्यात येणार आहे. या कामाचे २० जानेवारी रोजी राज्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांच्याहस्ते भूमिपूजन होणार असल्याचे आमदार संग्राम जगताप यांनी शनिवारी माध्यमांशी बोलताना सांगितले.

यावेळी पुतळा कृती समितीचे नेते अशोक गायकवाड, सुरेश बनसोडे, अजय साळवे, सुमेध गायकवाड, मनपाचे अतिरिक्त आयुक्त डॉ, प्रदीप पठारे, माजी स्थायी समिती सभापती कुमार वाकळे, शहर अभियंता मनोज पारखे, अभियंता परिमल निकम, श्रीकांत निंबाळकर, माजी नगरसेवक प्रशांत गायकवाड, राहुल कांबळे आदी उपस्थित होते. पुतळा उभारणीसंदर्भात ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड यांनी सांगिले की, सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात उभारण्यात आलेल्या पुतळ्यानंतर त्या पुतळ्याची प्रतिकृती नगर शहरात उभारण्यात येत आहे. १८ फुटी चबुतऱ्यावर १० फुटी पुतळा व एकूण उंची २८ फुटांची राहिल. येत्या सहा महिन्यांत या पुतळ्याचे काम पूर्ण होणार आहे. २० जानेवारी सायंकाळी ५ वाजता भूमिपूजन होणार आहे.



# नगरसेवक डॉ अरविंद माने यांच्याकडून अक्षता व श्रीराम प्रतिमेचे घरोघरी वाटप

**शिरोळ :** आयोध्या येथील श्री राम मंदिरात होणाऱ्या मूर्ती प्रतिष्ठापनाच्या निमित्ताने शिरोळ मधील माजी नगरसेवक डॉ अरविंद माने यांनी आपल्या प्रभागातील घरोघरी श्री रामाची प्रतिमा व अक्षताचे वाटप केले आहे.

सोमवार दिनांक २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्या येथे श्री राम जन्मभूमीवर बांधण्यात आलेल्या नवीन श्रीराम मंदिरातील तळमजल्यावरील गर्भगृहात प्रभू श्रीरामांची बालस्वरूपातील नवीन मूर्ती विराजमान होऊन तिची प्राणप्रतिष्ठापना केली जाणार आहे यामुळे देशात सर्वत्र या दिवशी श्रीराम जन्मोत्सव सोहळा म्हणून साजरा करण्यात येणार आहे यासाठी घरोघरी श्रीराम प्रतिमेचे व अक्षताचे वाटप करण्यात येत आहे शिरोळचे माजी नगरसेवक आणि भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा कोल्हापूर जिल्हा ग्रामीण पूर्वचे अध्यक्ष डॉ अरविंद माने व जायटंस् ग्रुप ऑफ शिरोळ सहेलीच्या अध्यक्षा सौ सारिका अरविंद माने यांनी आपल्या कार्यकर्त्यांच्या समवेत प्रभाग क्रमांक २ मधील घरोघरी जाऊन श्रीरामाची प्रतिमा व अक्षताचे वाटप केले

यावेळी बोलताना डॉ अरविंद माने म्हणाले की सोमवारी आयोध्या येथील श्री राम मंदिरातील तळमजल्यात होणारा रामलल्ला मूर्ती प्रतिष्ठापना या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्याचे भाग्य आपणा सर्वांना लाभले आहे यामुळे हा दिवस श्री राम जन्मोत्सव दिवस म्हणून साजरा करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेऊन धार्मिक कार्यात सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले.

# संक्रांतीचा वाणवसा घेण्यासाठी विठ्ठल मंदिर परिसर गर्दीने फुलला

**सोलापूर :** मकर संक्रांतीनिमित्तसोमवारी पहाटेपासून सुवासिनी महिलांची वाणवसा घेण्यासाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात गर्दी झाली होती. त्यामुळे मंदिर परिसर महिला भाविकांच्या गर्दीने फुलून गेल्याचे दिसून आले. यामध्ये सौभाग्याचे लेणं समजला जाणारा लाखेचा चुडा भरण्यासाठीही महिलांची गर्दी झाली होती.मकर संक्रांतीनिमित्तविठ्ठल मंदिरातील रुक्मिणीमाता, महालक्ष्मी मंदिरात सुवासिनी महिलांची वाणवसा घेण्यासाठी भल्या पहाटेपासून गर्दी झाली होती. यावेळी महिला हळदी-कुंकू, बोरं, उसाच्या लहान कांड्या, ढाळा, तिळगूळ, संक्रांतीचे सुगड घेऊन वाणवसा



करून परंपरेप्रमाणे एकमेकींच्या डोक्यावर तीळ टाकून, हातावर तिळगूळ देऊन सणाचा आनंद लुटत होत्या. तसेच शहरातील सुवासिनी महिला दिंडीर वनातील लखुबाई, एकविरामाता, हरिदासाची देवी, अंबाबाई, पद्मावती, यमाईतुकाई, आदी मंदिरांमधून वाणवसा करीत असल्याचे दिसत होते. याबरोबरच उपनगरातील महिला त्या त्या भागातील मंदिरामधून एकमेकींना हळदी-कुंकू लावून संक्रांतीचा सण उत्साहात साजरा करीत होत्या.

विठ्ठल-रुक्मिणी मंदिरासह चंद्रभागा वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग आणि स्टेशन रोडवरही महिलांच्या वाणवसा घेण्यासाठी अगदी झुंडी येताना दिसत होत्या.

विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी गोपाळपूर रस्त्यावरील पत्राशेडपर्यंत दर्शन रांग पोहोचलेली दिसत होती. संक्रांत सणानिमित्त विठ्ठल मंदिरात वेगवेगळ्या फळा, फुलांबरोबरच सुवासिनी महिलांकडून केल्या जाणाऱ्या वाणवश्यामध्ये समावेश असलेल्या भाजीपाल्यांची आकर्षक सजावट केल्याचे दिसत होते.

यामध्ये ज्वारीचे कणीस, हरभऱ्याचा ढाळा, दाणेदार ज्वारीचा हुरडा, ऊस, गाजर, बोरं, शिमला मिरची, आदींचा समावेश होता.

# नागपूरकरांचा संक्रांत सण उत्साहात

**नागपूर :** नवीन वर्षातील पहिला सण असलेला मकर संक्रांत नागपूरकरांनीउत्साहात व तेवढाच संयमात साजरा केला. ऊर्जा, उत्साह व समृद्धीचा सण मकर संक्रांतनिमित्त लोकांनी ‘तिळगुळ घ्या, गोड गोड बोला...’ म्हणत एकमेकांना शुभेच्छा दिल्या. महिलांनी एकमेकींना हळदी-कुंकू लावून वान वाटत, सुवासिनींच्या ओट्या भरून आनंद साजरा केला तर मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत पुरुषांनी जोशात पतंग उडवित ‘ओ... काट’ च्या आरोळ्यांनी आकाश निनादले. दरम्यान शहरातील विविध भागातील मंदिरातही दर्शनासाठी रांगा होत्या.मकर संक्रांतीच्या दिवशी सूर्य धनू राशीतून मकर राशीत प्रवेश करतो व उत्तरायण सुरू



होते. त्यानिमित्त सूर्याची पूजा केली जाते. तांदूळ व काळ्या उळदाची खिचडी, काळ्या तीळापासून बनलेल्या वस्तू, तीळगुळ, लोकरीचे कपडे, देशी तूप, तेल, शेंगदाणे, अन्न व धनदान केले जाते. देशभरात वेगवेगळ्या नावाने हा सण साजरा केला जातो. आजूबाजूच्या महिलांनी एकत्रित येत हळदीकुंकू, तिळगुळाची देवाणघेवाण करीत एकमेकांना अभिवादन केले. आपल्या सौभाग्यासाठी प्रार्थना केली. महाराष्ट्रामध्ये मकर संक्रांतीला हळदीकुंकू हा एक सामाजिक आणि सांस्कृतिक सण देखील मानला जातो. संक्रांतीपासून रात्रीचा अवधी कमी होऊन दिवस तीळ, तीळ वाढत जातो. थंडी कमी होते. त्यामुळे परस्परांना तीळगूळ देऊन स्नेहाचे बंधन दृढ करण्याचा हा सण नागपुरात उत्साहात साजरा झाला.

# पाण्यासाठी कोट्यावधींचा निधी, पण दररोज पाणी मिळणार कधी ?

**म्हसवड :** म्हसवड शहरात सध्या पालिकेकडुन होत असलेल्या पाणीपुरवठ्यामध्ये कमालीचा विस्कळीतपणा आला असल्याने शहराला सध्या १० दिवसांतुन पाणीपुरवठा होवु लागला आहे, यामुळे म्हसवडकर नागरीकांतुन पालिका विरोधात तीव्र संताप व्यक्त होत असुन पालिकेच्या नावाने टाहो फोडणाऱ्या सामान्य जनतेच्या भावना मुख्याधिकाऱ्यांनी ओळखुन याबाबत त्वरीत ठोस उपाययोजना करणे गरजेचे बनले आहे.

माण - खटावचे जलनायक अशी प्रतिमा असलेल्या आ. जयकुमार गोरे यांनी म्हसवडकर जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल थांबवण्यासाठी अमृत २.० योजनेतुन ८० कोटी रुपयांचा निधी मंजुर करुन आणला आहे, गत काही महिन्यांपुर्वी राज्याचे महसुल मंत्री राधाकृष्ण विखे - पाटील यांच्या हस्ते म्हसवड शहरात विविध विकासकामांसह सदर योजनेच्या कामाचे भुमीपुजनही मोठ्या थाटामाटात संपन्न झाले आहे, त्यावेळी आ. गोरे व मंत्रीमहोदयांकडुन म्हसवडकर जनतेला आश्वासीत करताना शहराला दररोज पाणी पुरवठा केला जाणार असल्याचे सांगितले होते, त्यामुळे म्हसवडकर जनता आनंदीत झाली होती, मंत्रीमहोदयांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या त्या कार्यक्रमात शहरातील विविध कोट्यावधी रुपयांच्या विकासकामांचे भुमीपुजन घेण्यात आले होते, यापैकी अद्याप एकाही



विकासकामाचा पालिकेकडुन शुभारंभ करण्यात आला नसला तरी पाणीपुरवठा योजनेचे काम सुरु झाल्याने नागरीकांतुन समाधान व्यक्त होत आहे. असे असले तरी सदर योजनेचे काम पुर्ण होवुन म्हसवडकरांना दररोज पाणी पुरवठा होण्यास अद्यापही काही महिने लागणार आहेत तोवर नागरीकांचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल होवु नये म्हणुन पालिकेने योग्य त्या उपाययोजना करणे गरजेचे आहे, मात्र येथे तसे काही होताना दिसत नाही त्यामुळे म्हसवडकरांना पिण्याचे पाणी १० दिवसांतुन एकवेळ मिळत आहे. सध्या जानेवारी महिना सुरु आहे, यंदाचा पावसाळा हा त्रृतु याठिकाणी न झाल्यासारखाच गेल्याने पाण्याची स्तोत्रही आटु लागल्याचे चित्र आहे, तर शहराची जिवनवाहिनी असलेल्या माणगंगेचे नदीपात्र हे कोरडे ठणठणीत पडले आहे. शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी जिवन प्राधिकरणाची योजना अस्तित्वात आहे त्यातुनच आजवर शहराला पाणी पुरवठा सुरु आहे मात्र सदर योजना ही काल बाह्य झाली असल्याने पाणीपुरवठा करणार्या पाईपलाईनला अनेकठिकाणी गळती लागली आहे त्याचा परिणाम मोठ्या प्रमाणावर शहराच्या पाणी पुरवठ्यावर होत आहे. तर शहराला पाणी पुरवठा करताना अडचणी येवु नयेत म्हणुन पालिकेने हद्दीतील काही विहिरी अधिग्रहण केल्या आहेत, त्या विहिरींचीही पाणी पातळी घटल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याचे चित्र सध्या म्हसवड शहरात दिसुन येत आहे. तर पालिकेकडुन पाणी पुरवठा सुळीत होत नसल्याने नागरीकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकर चे पाणी विकत घ्यावे लागत आहे,

**“**

**पालिकेकडुन उपाययोजना सुरु आहेत, लवकरच यश मिळेल**

**म्हसवड शहराला पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी ही अत्यंत जिर्ण झाली असल्याने वारंवार पाईप फुटणे, लिकेज होणे असे प्रकार वाढले आहेत, यावर पालिका बारकाईने लक्ष ठेवुन असल्याने त्याठिकाणी असा घोटाळा झाल्यास त्यावर त्वरीत उपाययोजना केल्या जात आहेत, तर नवीन योजनेचे काम ही युध्दपातळीवर सुरु आहे, मात्र शहराला पाणी पुरवठा करणार्या शेंबडेवस्ती वरील विहरीच्याही पाणी पातळीत घट झाल्याने पाणी पुरवठा लांबणीवर गेला आहे, सदर विहरीत जोवर उरमोडीचे आवर्तन येत नाही तोवर अशीच काहीशी परिस्थिती राहणार आहे, उरमोडीचे आवर्तन त्वरीत सोडण्यासाठी पालिकेकडुन संबधित विभागाला पत्रव्यवहार करण्यात आला असुन लवकरच त्याला यश येईल असे पालिका मुख्याधिकारी डॉ. सचिन माने यांनी सांगितले आहे. - मुख्याधिकारी डॉ. सचिन माने**

मात्र टँकरचालकांच्याही विहिरींचे पाणी घटल्याने मागणीप्रमाणे त्यांच्याकडुन पाणी पुरवठा होत नाही परिणामी जादा पैसे मोजणार्यालाच पाणी उपलब्ध होत आहे. परिणामी शहरवासीयांना गंभीर पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे.

आ. जयकुमार गोरे यांच्या आश्वासित घोषणांमुळे म्हसवडकरांच्या अपेक्षा नक्कीच उंचावल्या आहेत त्या अपेक्षा फोल ठरु नयेत यासाठी आता आ. गोरे यांनीच याठिकाणी लक्ष घालुन विस्कळीत झालेला पाणी पुरवठा सुरळीत करुन म्हसवडकरांचा विश्वास सार्थ ठरवावा अशी एकमुखी मागणी म्हसवडकरांतुन होत आहे.